cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२१४ | मंगळवार दि.२६ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महायुतीवर महाविश्वास, महाआघाडीवर अविश्वास

राज्य विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीत भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) या तीन पक्षांच्या महायुतीने देदीप्यमान विजय संपादन केला. विधानसभेच्या २८८ पैकी २३० पेक्षा जास्त जागांवर विजय संपादन करून विधिमंडळाच्या इतिहासात एक नवा विक्रम निर्माण केला. भारतीय जनता पक्षाने, तर २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाचे शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणून एक इतिहास निर्माण केला.

### भाजपचे नवे मिशन, महापालिका इलेक्शन

मुंबई–विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र जिंकल्यानंतर भाजपचे स्थानिक निवडणुकांकडे लक्ष लागले आहे. विधानसभा इतकेच बळ महापालिका, नगरपालिकासाठी भाजप लावणार असून त्याबाबत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंकडून पक्षाच्या जिल्हाध्यक्षांना सूचना दिल्या आहेत.

# भावच नसल्याने ऊसदराचे आंदोलन पेटणार!

## पहिली उचल ३७०० रुपये जाहीर करा, अन्यथा तीव्र आंदोलन करणार–राजू शेट्टी



**सातारा । प्रतिनिधी**

स्वाभिमानी शेतकरी संघटना पुन्हा एकदा आक्रमक आंदोलनाच्या पवित्र्यात आहे. भाव कमी असल्याने ऊसदराचे आंदोलन यंदाही पेटणार असल्याचे संकेत आहेत. ऊसाच्या यंदाच्या हंगामात पहिली उचल ३७०० जाहीर करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. गेल्या हंगामातील ज्यादाचे प्रतिटन २०० रुपये देण्याची मागणी केली आहे. याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त पुणे यांना पत्र लिहले आहे. मागणीवर येत्या १५ दिवसात निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचा

पान २ वर

### अजूनही साखर कारखान्याचे काटे ऑनलाईन नाही

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने वेळोवेळी मागणी करून देखील साखर आयुक्तांच्या नियंत्रणा खाली राज्यातील सर्व साखर कारखान्यांचे काटे ऑनलाईन झालेले नाहीत. राज्य सरकारने तातडीने सर्व साखर कारखान्यांचे वजन काटे ऑनलाईन करून एकाच सिस्टिममधील सॉफ्टवेअरमध्ये काटे बसवावेत, अशी मागणी देखील ऊस परिषदेत केली होती.

### वाहतुकदारांना गंडा घालणाऱ्या मुकादमांवर गुन्हे दाखल करा

राज्यातील ऊस तोडणी मुकादमांनी ऊस वाहतूकदारांना कोट्यवधी रूपयांचा गंडा घातलेला आहे. ते पैसे वसूल करण्यासाठी स्वाभिमानी उस वाहतूक संघटनेच्या माध्यमातून आमचा लढा सुरू आहे. ज्या मुकादमांनी फसवले आहे, त्यांच्यावर तातडीने गुन्हे दाखल करून उस वाहतूकदारांचे पैसे वसूल करून यावेत. अथवा मुकादमांनी पैसे बुडविलेल्या वाहनधारकांचे कर्ज माफ करावे, अशी मागणी देखील राजू शेट्टी यांनी केली होती.

## दिल्लीत ठरणार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याचे नाव

### शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजपचे किती आमदार होणार मंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे आता लवकरच शपथविधी होणार आहे. मंगळवार किंवा बुधवारी शपथविधी होणार असून किती मंत्री शपथ घेणार आहेत याची माहिती ही समोर आली आहे. मुख्यमंत्रीपदाबाबतचा सस्पेंस अजून कायम आहे. ज्यावर दिल्लीत शिक्कामोर्तब होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या बरोबर बैठक झाल्यावर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार हे ठरणार आहे.**

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता शपथविधीची तयारी सुरु झाल्याची माहिती समोर येते आहे. मंगळवारी महायुतीचा शपथविधी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. या मंत्रिमंडळात

पान २ वर






आष्टी–पाटोदा–शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश धस यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार भेट घेऊन आभार व्यक्त केले. यावेळी भारत जगताप उपस्थित होते.

## शरद पवार–अजितदादा कधीही एकत्र येतील; राष्ट्रवादीच्या नेत्याचे मोठे विधान

# मुख्यमंत्री भाजपचाच; दिल्लीतून शिंदेंना निरोप?

## उलथापालथ होणार; राज्यात नवे राजकीय समिकरण जुळणार?



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत आल्यानंतर सध्या सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु असाताना दिल्लीतून महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण? हे ठरले असून भाजपचाच मुख्यमंत्री असणार असा निरोप दिल्लीतून एकनाथ शिंदे यांना देण्यात आला आहे. त्यामुळे शिंदे नाराज असून त्यांनी सर्व गाठीभेटी रद्द केल्या आहेत. तर अजित पवार हे सुध्दा कसलीही सुरक्षा न घेता त्यांच्या बंगल्याबाहेर पडले असून ते दिल्लीला रवाना झाल्याचे समजते. तर दुसरीकडे राज्यात नवे

पान २ वर

### अमित शहा आज मुंबईत, शिंदे घेणार मोठा निर्णय

मुख्यमंत्री कोणाचा व्हावा याबद्दल अजूनही पेज निर्माण झालेला असून मुख्यमंत्री हा भाजपचाच होणार असा निरोप दिल्लीतून आल्याची माहिती आहे. त्यामुळे नाराज असलेले एकनाथ शिंदे हे मंगळवारी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे समजते. तसेच अमित शाह सुद्धा मुंबईला येणार असून मुख्यमंत्र्याचे नाव ते जाहीर करणार आहेत.

### वळसे पाटलांनी घेतली शरद पवारांची भेट



*आठव्यांदा आमदार झाल्यावर दिलीप वळसे पाटील यांनी अचानक शरद पवारांची भेट घेतली. ही भेट बंद दाराआड झालेली असून भेट नेमकी का घेतली हे मात्र पत्रकार परिषदेत वळसे पाटलांनी स्पष्ट केले नाही. त्यामुळे या भेटीचा आणि नरहरी झिरवाळ यांच्या विधानाचा काही संबंध आहे का? याविषयी आता तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. फडणवीस हे मुख्यमंत्री होऊ नयेत म्हणून पडद्याआड काही शिजत आहे का? असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.*

## आरक्षण द्या

### अन्यथा राज्यात फिरु देणार नाही–मनोज जरांगे



जालना: पूर्वीही महायुतीचेच सरकार होते आणि आताही महायुतीचेच सरकार आले आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावला नाहीतर महायुतीच्या नेत्यांचे राज्यात फिरणं अवघड करणार असल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्याचबरोबर सरकार स्थापन झाल्यानंतर उपोषणाला सुरूवात होणार असल्याचेही मनोज जरांगे म्हणाले.



गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार, धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले.






## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ३.०० क्विंटल | | |
| २,८०१ | ३,११० | २,९५५ |
| ज्वारी/हायब्रिड : ४३.००क्विंटल | | |
| २,०५० | २,५०० | २,२३२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | | |
| २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | | |
| ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २५.०० क्विंटल | | |
| ६,८७० | ६,८७० | ६,८७० |
| बाजरी: १८.५० क्विंटल | | |
| २,६०० | ३,२५० | २,८९६ |
| मुग : ९.०० क्विंटल | | |
| ७,०३१ | ७,०३१ | ७,०३१ |
| सोयाबीन: ४६९.०० क्विंटल | | |
| ३,६२० | ४,२०० | ४,०५५ |
| हरभरा: १.५० क्विंटल | | |
| ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |






cmyk

## अग्रलेख

# महायुतीवर महाविश्वास, महाआघाडीवर अविश्वास

राज्य विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीत भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) या तीन पक्षांच्या महायुतीने देदीप्यमान विजय संपादन केला. विधानसभेच्या २८८ पैकी २३० पेक्षा जास्त जागांवर विजय संपादन करून विधिमंडळाच्या इतिहासात एक नवा विक्रम निर्माण केला. भारतीय जनता पक्षाने, तर २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाचे शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणून एक इतिहास निर्माण केला. गद्दारांना पाडा, अदानींना हटवा अशा घोषणांचा घोशा लावणाऱ्यांना आणि 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला विरोध करणाऱ्यांना जनतेने धडा शिकवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच शब्दात सांगायचे तर सावत्र भावांना बहिणींनी या निवडणुकीत जोडा दाखवला.

यंदाची विधानसभेची निवडणूक महायुती व महाआघाडीच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेची होती. राज्यात गेल्या पाच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना असे अडीच वर्षे महाआघाडीचे सरकार होते आणि नंतर शिवसेना व राष्ट्रवादीत झालेल्या बंडानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा, शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी (अजितदादा) या पक्षांचे महायुतीचे सरकार जनतेने अडीच वर्षे अनुभवले. महायुतीचे सरकार चांगले होते की महाआघाडीचे असा मुद्दा यंदाच्या निवडणुकीत होता. मतदारांनी महायुतीवर महाविश्वास प्रकट केला, तर महाआघाडीवर अविश्वास दाखवला. असे का झाले, याचे आत्मचिंतन महाआघाडीच्या तिनही पक्षांनी केले पाहिजे. केवळ नकारात्मक भूमिका घेऊन राजकारण करणे अंगलट येते तसेच दुसऱ्याला सतत गद्दार म्हणताना आपण खूप प्रामाणिक आहोत असा आव आणणे हेही जनतेला पसंत पडलेले नाही. माजी केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी या निवडणुकीत कमाल केली. सिंधुदुर्ग जिल्हा म्हणजे राणेच हे निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा जनतेनेच सिद्ध करून दाखवले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनतेचा सर्वाधिक विश्वास नारायण राणे व त्यांच्या परिवारावर आहे हे निकालानंतर स्पष्ट झाले. कुडाळमधून निलेश राणे, कणकवलीतून नितेश राणे आणि सावंतवाडीतून दीपक केसरकर निवडून आले. संपूर्ण जिल्ह्याने महायुतीला भरभरून मतदान केले.

सन २०१४ मध्ये वैभव नाईक यांनी नारायण राणे यांचा पराभव केला होता, त्या पराभवाचे उट्टे निलेश राणे यांनी यावेळच्या निवडणुकीत काढले. आपल्या हिंदुत्वाला मतदारांनी पसंती दिली, हिंदुत्व हे सर्वमान्य आहे हेच निकालाने दाखवून दिले अशी प्रतिक्रिया नितेश राणे यांनी दिली, तर शिवसेना खरी कोणाची याचे उत्तर जनतेने मतदानातून दिले असे दीपक केसरकर यांनी म्हटले आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात मिळून विधानसभेचे आठ मतदारसंघ आहेत, पैकी सात मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांच्या विजयी मिरवणुका निघाल्या. शिवसेनाप्रमुखांच्या हयातीत कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला ओळखला जात असे. त्याच बालेकिल्ल्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उबाठा सेनेला सर्वत्र पराभव पत्करावा लागला आहे. कोकणातील जनतेने उबाठा सेनेला या निवडणुकीतून हद्दपार केले आहे. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत नारायण राणे यांनी रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून प्रचंड विजय मिळवला. उबाठा सेनेला धूळ चारली. आता राणे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीत महायुतीने उबाठा सेनेचा धुव्वा उडवला. राज्यात जिथे-जिथे खोटे नाटे आरोप करून, बनावट कथानके रचून आणि पक्ष सोडून गेलेल्या आमदारांना गद्दार असे संबोधून त्यांना पाडण्याचे आवाहन उबाठा सेनेने केले, तेथे उबाठा सेनेलाच फटका बसला. हिंदुत्वाचा त्याग करून उद्धव ठाकरे यांनी महाआघाडी सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद मिळवले ते लोकांना पसंत नव्हते. निवडणुका भाजपाबरोबर युती करून लढवायच्या व नंतर काँग्रेसबरोबर आघाडी करून सरकार स्थापन करायचे हा डबल गेम महाराष्ट्रातील जनतेला आवडला नव्हता.

२०१९ मध्ये जनतेने ठाकरे यांच्या पक्षाला काँग्रेसच्या विरोधात मतदान केले होते, पण निकालानंतर त्यांनी काँग्रेसशी केलेला घरोबा जनतेला पसंत पडला नाही. त्याची शिक्षा विधानसभा निवडणुकीत मतदारांनी उबाठा सेनेला दिली. दारुण पराभव झाल्यानंतर ईव्हिएम मशीनवर संशय घेणे आणि ईव्हिएम मशीन्स मॅनेज केली असे सांगणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असे म्हणावे लागेल. राहुल गांधी यांच्या भगिनी प्रियंका गांधी या केरळमधील वायनाड मतदारसंघातून लोकसभेवर चार लाखांचे मताधिक्य घेऊन निवडून आल्या. उबाठा सेनेचे भांडुपच्या प्रवक्त्यांचे बंधु हे विक्रोळी मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले, पक्ष प्रमुखांच्या परिवारातील एक जण वरळीतून व दुसरा वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडून आला, झारखंडमध्ये तर झारखंड मुक्ती मोर्चा पुन्हा सत्तेवर आला, जेलमध्ये राहिलेले मुख्यमंत्री हेमंत सोरेनसुद्धा पुन्हा निवडून आले. जिथे महाआघाडी किंवा इंडियाचे आमदार निवडून आले तिथे मात्र ईव्हिएम मशीन्स एकदम व्यवस्थित होती आणि पराभव झाला तिथे गडबड होती असे दुटप्पी बोलण्यावर कोण विश्वास ठेवणार? आपण निवडून आलो तर जनादेश मिळाला म्हणून सांगायचे, पराभूत झालो तर ईव्हिएम मशीन्समधे गडबड केली असा आरोप करायचा, हा खोटारडेपणा झाला. इंदिरा गांधींच्या काळातही काँग्रेस पक्षाला १९७१ च्या निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळाल्यावर हा विजय बाईचा नाही, गाईचा नाही, तर शाईचा आहे असा आरोप झाला होता. तेव्हा तर निवडणुकीत मतपत्रिका होत्या.

पराभूत झाल्यावर निवडणूक यंत्रणा व व्यवस्थेवर खापर फोडायचे व आपल्या दुर्बलतेला झाकायचे त्यातलाच हा प्रकार आहे. विधानसभा निवडणुकीत जनतेने दिलेला निकाल खुल्या मनाने स्वीकारावा आणि भाजपाने जे भव्य दिव्य यश संपादन केले त्याबद्दल देवाभाऊंचे अभिनंदन करावे असा दिलदारपणा महाआघाडीकडे नाही, हेच दिसून आले. जनतेने आपल्याला नाकारले आहे, हे महाआघाडीने मान्य केले पाहिजे व महायुतीच्या नव्या सरकारला राज्याच्या विकासासाठी साथ देण्याची तयारी दर्शवली पाहिजे.

## सुरेश धस यांच्या भाषणाचा विपऱ्यास करून वातावरण खराब करणाऱ्यांची कीव येते-रेवण खाडे

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात सुरेश धस यांचा प्रचंड मताने विजय झाला.विजय झाल्यानंतर सुरेश धस यांनी विजयी सभेत केलेल्या भाषणाचा काही संधीसाधू लोकांनी विपर्यास करून त्यांची राजकीय पोळी भाजण्याचा केविलवाणा प्रयत्न असून त्यातून आ.पंकजाताई मुंडे आणि आ.सुरेश धस यांच्यातील दरी आणखी कशी वाढेल यासाठी काही विघ्नसंतोषी लोक जे नेहमी समाजासमाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.अशा लोकांनी विधानसभा निवडणुकीत झालेल्या काही अप्रिय घटना बाबत सत्य परिस्थिती समजून घेतली पाहिजे असे मत सामाजिक कार्यकर्ते रेवणनाथ खाडे यांनी व्यक्त केले भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्व असलेल्या आमदार पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांनी विधानसभा निवडणुकीतील प्रचारांमध्ये अपक्ष उमेदवाराचे प्रचार करण्यास सांगितले आहे असा व्हिडिओ झाल्याने पाच टर्म आमदार राहिलेले नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी हा प्रकार धक्कादायक असल्याचे वक्तव्य केले होते याबाबत त्यांनी मनातील खंत व्यक्त केली याचा विपर्यास अपक्ष उमेदवाराचा प्रचार केलेल्या काही व्यक्तींनी गैरफायदा घेत या दोन मोठ्या नेतृत्वामध्ये भांडणे लावण्याचा उद्योग केला आहे असे सांगून**

विजयी सभेत आ.सुरेश धस यांनी जे सांगितलं ते म्हणजे पंकजाताई मुंडे यांनी मला मदत केली नाही,मला पाडण्यासाठी प्रयत्न केले हे माझ्या मनाला लागलं असे ते म्हणाले.म्हणजे ताई तुमच्या कट्टर म्हणवणाऱ्या आणि तुम्ही मतदार संघात आल्या की तुमच्या आजूबाजूला मोहोळा सारखे चिकटणाऱ्या लोकांनी मी अडचणीत असताना मला मदत तर केली नाहीच शिवाय माझ्या विरोधात अपक्ष उमेदवाराचा जाहीर प्रचार केला.अशावेळी तुम्ही त्यांना सुनावलं पाहिजे होत मात्र तुम्ही देखील काही बोलला नाहीत.म्हणजे याला तुमचा दुजोरा असल्याचे दिसून आले असे ते म्हणाले.मात्र त्यांच्या भाषणातील मतितार्थ कोणीही लक्षात घेतला नाही.शिवाय याची शहानिशा करण्याचा प्रयत्न देखील कुणी केला नाही.उलट ही संधी साधत आ.पंकजाताई मुंडे आणि आ.सुरेश अण्णा धस यांच्यातील दरी कशी वाढेल याचा जे लोक प्रयत्न करत आहेत त्या लोकांनी सुरेश अण्णांना मदत तर केली नाहीच उलटपक्षी अपक्ष उमेदवार यांच्या शिट्टीचा प्रचार करण्यासाठी गावोगाव बैठका घेऊन पंकजा ताईंचा निरोप आहे असे उघडपणे सांगत विरोध केला.अशावेळी भाजपचे उमेदवार असलेले सुरेश धस यांनी लोकसभेला पंकजाताईंना निवडून आणण्यासाठी दिवसरात्र एक केले.मराठा समाजाचा रोष पत्करत दारोदार फिरले.मराठा बहुल गावातून पंकजाताईंना मताधिक्य दिले.३२ हजाराची लीड देण्याचे काम केले.अशावेळी सुरेश धस यांची प्रामाणिक इच्छा होती की मी अडचणीत असल्यावर मला प्रामाणिक मदत झाली पाहिजे.कारण भाजपचे ते उमेदवार होते,अशावेळी त्यांना अडचणीत आणण्यासाठी जर प्रयत्न झाला असेल तर त्यांनी त्यांच्या मनातील खंत बोलून दाखविने स्वाभाविक होते.मात्र याचा विपर्यास करून मतदार संघातील वातावरण खराब करण्यासाठी निवडून न आलेले विरोधक जर याचे भांडवल करत असतील तर त्याच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते असे मत रेवणनाथ खाडे यांनी व्यक्त केले.



## नवीन सरकार येताच लाडक्या बहिणींना मिळणार गिफ्ट

### खुशखबर: संजय सिरसट यांनी दिली महत्वाची माहिती

**संभाजीनगर । वृतसंस्था**

**सत्तास्थापनेनंतर महायुती लाडकी बहिण योजनेची रक्कम वाढवण्याबाबत पहिला निर्णय घेणार अशी माहिती शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी दिली आहे. तसेच येत्या हिवाळी अधिवेशनात योजनेची रक्कम वाढवण्याची तरतुद केली जाईल असेही त्यांनी सांगितले.**





लाडकी बहिण योजनेचे १५०० रुपये मानधन मिळते. या मानधनात वाढ होऊन आता १५०० नाही २१०० रुपये मिळणार असल्याचे देखील समजते. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिण योजना बंद होणार नाही, असे आश्वासन दिले आहे. यामुळे येत्या काळात ही महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणार आहे. महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना आणली. दर महिना १५०० रुपये महिलांच्या बँक खात्यात थेट जमा केले. लाडकी बहीण योजनेवरून प्रचंड चर्चा झाली. निवडणुकीत महायुती सरकारने या योजनेवरून जोरदार प्रचार केला. यामुळेच या निवडणुकीत महिलांच्या मतदानाचा टक्का वाढलाय. लाडकी बहीण योजनेमुळे महिलांनी महायुतीला पाठिंबा दिल्याचा दावा महायुतीचे नेते करताहेत. लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरल्याची देखील चर्चा आहे.

# यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे शानदार उदघाटन

### विचार आणि आचार संकुचित होणाऱ्या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज-तुषार गांधी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**विचार आणि आचार संकुचित होणा-या काळात यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज आहे असे मत गांधीवादी विचारवंत तुषार गांधी यांनी व्यक्त केले. येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे उदघाटक म्हणून तुषार गांधी बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्रख्यात सिनेअभिनेते तथा चित्रपट व मालिकांचे दिग्दर्शक किरण माने होते तर व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडु लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे उपस्थित होते.**

यावेळी बोलताना तुषार गांधी पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्या सारखी माणसं होवून गेली का नाही अशी शंका निर्माण होणाऱ्या परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी अशा तीन दिवसीय समारोहाचे आयोजन करण्यात येते ही खुप समाधानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत खुप महत्वाचा वाटा आहे. महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा त्यांनी दिला. भारत चीन घ्या युद्धकाळात संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा ही त्यांनी उल.लेख केला. आजच्या परिस्थितीत संपूर्ण देशभर संविधान विरोधी वातावरण निर्माण करण्याचे काम किमी जण जाणीवपूर्वक करीत आहेत अशा परिस्थितीत याविरुद्ध सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे आवाहन तुषार गांधी यांनी केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रख्यात सिने अभिनेता दिग्दर्शक किरण माने यांनी आपल्या भाषणात किरण माने यशवंतराव चव्हाण यांच्या अंत्यसंस्कारासाठी मला उपस्थित राहता आले हे माझं भाग्य. यशवंतराव चव्हाण हे गोरगरीब, शोषीत दलीत यांच्या उध्दारासाठी झटणारे नेते होते. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी देवराष्ट्र या गावात असपृशांसाठी शाळा महर्षी वि. रा. शिंदे यांच्या हस्ते सुरू केली. यशवंतराव चव्हाण हे समाजकारणातुन राजकारणात आले. आमदार झाले, मंत्री झाले, मुख्यमंत्री, उपपंतप्रधान झाले. सत्तेचा कैफ आपल्या डोक्यात न जावू देणारा हा नेता होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा असला तरी निर्मितीनंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत आपला काहीही सहभाग नाही हे ठासून सांगणारा हा नेता होता. यशवंतराव चव्हाण हे तरल संवेदनशीलता, समाजभान, गरीबांची जाण असलेला नेता होता. अशा या थोर माणसांच्या विचारांचा जागर होणार महाराष्ट्रातील अंबाजोगाई हे एकमेव गाव असल्याचा आपल्या अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी दीपप्रज्वलन व यशवंतराव चव्हाण, व स्व.भगवानराव लोमटे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ३९ वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व.श्री. भगवानरावजी लोमटे उर्फ बापू, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहका-यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरराव चव्हाण यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी केली. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला-संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंराव चव्हाण स्मृती समारोहात देण्यात येते. या पुर्वी आयोजित करण्यात आलेल्या स्मृती समारोहाच्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील अनेक मान्यवर विचारवंतांनी आपली हजरी लावली असून आज या समारोहाचे उदघाटन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत तुषार गांधी यांच्या हस्ते व प्रख्यात सिनेअभिनेते तथा अनेक चित्रपट व मालिकांचे दिग्दर्शक किरण माने यांच्या हस्ते होत आहे याचा आपणास मनस्वी आनंद होतो आहे असे त्यांनी सांगितले. प्रारंभी उपस्थित




मान्यवरांचे स्वागत यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचे सतीष लोमटे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रा. मेघराज पवळे यांनी मानले. यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. मेघराज पवळे यांनी मानले. उदघाटन समारंभानंतर रात्री ठाणे येथील ज्येष्ठ कवयित्री डॉ. प्रज्ञा दया पवार यांच्या अध्यक्षतेखालील रंगदार कवी संमेलन संपन्न झाले. या कवी संमेलनाचे बहारदार सूत्र संचलन अकोला येथील सुप्रसिद्ध कवी गझलकार गोपाळ मापारी यांनी केले तर या कवी संमेलनात डॉ. वृषाली किन्हाळकर (नांदेड), प्रा. सिसिलिया कार्व्हालो (वसई), संगीता बर्वे (पुणे), संजय चौधरी (नाशिक), बालाजी मदन इंगळे (उमरगा), रमजान मुल्ला (सांगली), जयंत चावरे (यवतमाळ), पूजा भडांगे (बेळगाव), सुनिती लिमये (पुणे), बालाजी सुतार (वर्धा-अंबाजोगाई), नारायण पुरी (छत्रपती संभाजीनगर), नितीन वरणकार शेगाव आणि संजय आढाव परळी यांचा सहभाग होता. आजचे (२६ नोव्हेंबर) कार्यक्रम मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी शालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहेत. सकाळी १० वा. बालआनंद मेळावा आयोजित केला असून मुलांच्या आत्मबळ निर्माण करणारे राजेंद्र बहाळकर पुणे हे अध्यक्ष असतील तर यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळ सराफ व आनंदवन वरोरा येथील धान्य रांगोळीकार चित्रकार प्रल्हाद ठक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील व शालेय चित्रकला स्पर्धेचे विजेते यांना परितोषिके प्रदान करतील. रांगभरण शालेय चित्रकला स्पर्धा त्या त्या शाळेत घेतल्या जात आहेत. तर ऐच्छिक विषय दिलेल्या ८ वी ते १० वी विद्यार्थ्याचे स्पर्धा कार्यक्रम स्थळी होतील. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल व दोन्ही गटातील प्रथम, द्वितीय, तृतीय व उतेजनार्थ विजेत्यांना रोख बक्षीस पाहुण्यांच्या हस्ते दिले जातील. . सायं. ८ वा. सुगम संगीताचे आयोजन केले आहे. मुंबई येथील सुप्रसिद्ध सुफी व गझल गायिका पूजा गायतोंडे यांचा मराठी, उर्दू, हिंदी गझल गायनाचा रंगरेझा हा संगीतबद्ध सादर करतील. साथसंगत मनोज राउत (किबोर्ड), शंतनु मायी (तबला), योगेश इंदोरी या (ढोलक) यांची असेल. कै.भगवानरावजी लोमटे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या समारोहाचे महाराष्ट्रभर कौतुक झालेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात पोहचलेल्या या समारोहास रसिक श्रोत्यांनी तिन्ही दिवस उपस्थित राहुन सहकार्य करावे व कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष प्राचार्य कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा.सुधीर वैद्य, कोषाध्यक्ष सतिश लोमटे, सदस्य, प्राचार्य प्रकाश प्रयाग, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, प्रा.भगवान शिंदे, यांनी व इतर पदाधिकारी तसेच सल्लागार भगवानराव शिंदे बप्पा व राजपाल लोमटे यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### दिल्लीत ठरणार महाराष्ट्राचा

एकूण २० मंत्री शपथ घेणार असल्याचे बोललं जात आहे. शिवसेनेच्या मंत्रिपदाच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. पहिल्या टप्प्यात शिवसेनेचे ५ मंत्री शपथ घेणार आहेत आणि राष्ट्रवादीचे ही पाच मंत्री शपथ घेणार आहेत. तर भाजपचे १० मंत्री शपथ घेणार आहेत. दोन्ही पक्षाने संभाव्य आमदारांची नावे दिल्लीत पाठवली होती. ज्यावर शिक्कामोर्तब झाल्याचे कळते आहे. तसेच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार? यावर देखील दिल्लीतील होणाऱ्या बैठकीत निर्णय होणार असून मोदी-शहा यांच्याबरोबर चर्चा करुनच अंतिम नाव जाहीर होण्याची शक्यता आहे.

**पहिल्या टप्प्यात २० मत्री घेणार शपथ?**

शिवसेनेकडून एकनाथ शिंदे, उदय सामंत, तानाजी सावंत, दीपक केसरकर, शंभुराज देसाई हे मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचे कळते आहे. तर राष्ट्रवादीकडून अजित पवार, अदिती तटकरे, अनिल पाटील, धनंजय मुंडे आणि दिलीप वळसे पाटील शपथ घेणार आहेत. मात्र मुख्यमंत्री कोण होणार याचा सस्पेंस अजूनही कायम आहे. पहिल्या टप्प्यात असे एकूण २० मंत्री शपथ घेणार आहेत.

**भाजपकडून गटनेता निवडीला विलंब**

विधानसभा निवडणुकीत भाजपने अजूनही पत्ते उघडलेले नाहीत. एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करावे, अशी मागणी केली जात आहे. तर दुसरीकडे भाजपचे अद्यापही काहीच ठरताना दिसत नाही. मित्रपक्षांनी बैठक घेत नेता निवडीचा निर्णय घेतला. पण भाजपकडून गटनेता निवडीबाबत अद्याप तरी विलंब केला जात आहे.

----------

### भावच नसल्याने

इशारा शेट्टींनी दिला आहे. ऊस परिषदेत देखील राजू शेट्टी यांना ऊसाची पहिली उचल ३७०० रुपये देण्याची मागणी केली आहे. तसेच मागच्या हंगामातील २०० रुपये द्यावे असी मागणी केली होती. आता या हंगामातील साखर कारखाने सुरु झाले आहेत. १५ नोव्हेंबरपासून ऊसाचा गळीत हंगामा सुरु होणार होता. मात्र, विधानसभा निवडणुकीमुळं ऊसाचा हंगाम उशीरा सुरु झाला आहे. कडक उन्हामुळं ऊसतोडणी मजुराकडून व ऊसतोडणी मजुराकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे. एकरी ५ ते १० हजार रुपयांची मागणी केली जात असल्याचं राजू शेट्टी यांनी पत्रात म्हटले आहे. सोलापूर जिल्ह्यातील एका सहकारी साखर कारखान्याने १०.८० टक्के रिकव्हरी असूननही ३५०० रुपये पहिली उचल देण्याचे जाहीर केले आहे. तर १२३ ते १२. ३० टक्के रिकव्हरी असणाऱ्या साखर कारखान्याने ऊसतोडणी वजा जाता ३७०० रुपयांचा दर देण्यास काहीही अडचण नसल्याचे राजू शेट्टी यांनी पत्रात म्हटलं आहे. येत्या १५ दिवसात जर ऊसाच्या दराबाबत काही निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.

------------

**मुख्यमंत्री भाजपचाच;**

राजकीय समिकरण जुळण्याची शक्यता असल्याचे संकेत असून शरद पवार आणि अजित पवार हे कधीही एकत्र येवू शकतात, असे मोठे विधान अजितदादांच्या पक्षाचे जेष्ठ नेते नरहरी झिरवाळ यांनी केले आहे. त्यामुळे शरद पवार राज्यात काही तरी वेगळी खेळी करण्याच्या तयारीत असल्याचीही चर्चा आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकासआघाडी अशी लढत झाली होती. या लढतीत महायुतीला एकमत मिळाले तर महाविकासआघाडीचा सुपडासाफ केला आहे. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यानंतर सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या असून देवेंद्र फडणवीस हे दिल्लीत तळ ठोकून आहेत. राज्याचा मुख्यमंत्री कोण असावा यावर अमित शहा व पक्षाच्या जेष्ठ नेत्यांबरोबर चर्चा केली जात आहे. सोमवारी यावर बरीच चर्चा होऊन शेवटी मुख्यमंत्री हा भाजपचाच असेल असा निर्णय दिल्लीत झाल्याची माहिती आहे. तसा निरोप सुध्दा दिल्लीतून एकनाथ शिंदे यांना दिला असल्याचे समजते. त्यामुळे शिंदे नाराज असून त्यांनी सर्व गाठीभेटी रद्द केल्याचे समजते. महायुतीत मुख्यमंत्री पदावरुन खलबत्ते सुरु असताना राज्यात नवे राजकीय समिकरण जुळण्याच्या मार्गावर असल्याचे बोलले जात आहे. देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री न होऊ देण्यासाठी वेगळी खेळी व नवे राजकीय समिकरण तयार होण्याची शक्यता आहे. अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार नरहरी झिरवाळ यांनी एक मोठा दावा केला आहे. अजित पवार आणि शरद पवार कधीही एकत्र येऊ शकतात, असे विधान नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४



# बीडमध्ये पांगरी रोडवर तरूणाचा मृतदेह



बीड । प्रतिनिधी

शहरातील पांगरी रोडवर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास एका तरूणाला बेदम मारहाण करून सौभाग्य लॉन्स जवळील दुकानाजवळ टाकून दिल्याची प्राथमिक स्वरूपात दिसत होते. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर त्यांनी पाहणी केली असता सदरील तरूण मयत झाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, सदरील मृतदेहाची जिल्हा रूग्णालयात डॉक्टरांनी तपासणी केली असता, सदरील तरूणाला अज्ञात वाहनाने उडल्याचे समोर आले असून सदरील त्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

# कृषी पदवीधर युवकाने बनवलेले बहुउपयोगी यंत्र पाहण्यासाठी डॉ. मोटे थेट शेतकऱ्याच्या बांधावर

**चौसाळा । प्रतिनिधी**

शेती व्यवसाय सध्या जिकरीचा झाला आहे. त्यातच अनेक शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करत शेती व्यवसाय करावा लागत आहे. त्यात मजुरांची टंचाई, शेती मशागतीसाठी लागणारा वेळ, वेळेवर न होणारी शेतीची कामे , वाढती मजुरी, वाढत जाणारे शारीरिक कष्ट, मजुांकडून होणारी अकुशल शेत कामे अश्या अनेक अडचणींचा सामना शेतकऱ्यांना सध्या करावं लागत आहे, त्यामुळे शेतीमध्ये वाढत जाणारा खर्च आणि मजुरांच्या टंचाई मुळे वेळेवर न झालेली कामे यामुळे उत्पादन खर्च जास्त व उत्पन्न कमी झाले आहे यावर उपाय म्हणून अशाच प्रकारे कृषी पदवीधारक तरुणाने वेगवेगळे प्रयोग करून ट्रॅक्टर चलीत बहूउपयोगी यंत्र तयार केले आहे, हा यंत्र पाहण्यासाठी थेट विभागीय कृषी सहसंचालक छ.संभाजीनगर येथून डॉ तुकाराम मोटे सर, यांनी कृषी पदवीधर सौरभ निनाळे यांच्या शेतात प्रत्यक्ष जाऊन भेट दिली,व यंत्रची पाहणी केली, शेती क्षेत्रामध्ये अश्याच उच्च शिक्षित तरुणांची आवश्यकता आहे कृषी पदवीतील ज्ञानाचा योग्य वापर शेतकऱ्यांना झालाच पाहिजे ही प्रत्येक कृषी पदवीधरकाची जबाबदारी आहे सौरभ सारख्या सुशिक्षित हुशार होतकरू तरुणांची आजच्या पिढीला नितांत आवश्यकता आहे, त्याने असेच नवनवीन प्रयोग करून प्रगती करावी कृषी विभाग पाठीशी राहील असे ते म्हणाले, व शुभेच्छा दिल्या. त्यावेळी अशोक लोढा, डॉ बाबू जोगदंड, डॉ दिलीप मोटे,जेष्ठ पत्रकार ऐन.ती . वाघमारे आदी उपस्थित होते

शेती करतांना शेतकऱ्यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. त्यात कमी खर्चात लागवडीपासून उत्पादन निघेपर्यंत त्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र काहीजण वेगवेगळे प्रयोग करून नवीन असे काही करण्याचा प्रयत्न करत असतात. अशाच प्रकारे बीड तालूक्यातील चौसाळा येथील सौरभ निनाळे या तरुण कृषी पदवीधरकाने पिकांच्या अंतर्गत माश्यागतीसाठी जसे की तूर, ऊस, कापूस, भाजीपाला, फळबाग अश्या इत्यादी पिकांच्या







अंतर्गत माश्यागतीसाठी एक बहूउपयोगी यंत्र तयार केले आहे

हे यंत्र पिकांमध्ये ऐकाच वेळी ७-८ प्रकारची वेगवेगळी कामे करू शकतो जसे की उगवणी पूर्व तणनाशक, तसेच उगवणी पछयात तणनाशक फवारणी करणे, पिकाला कीटकनाशक बुरशीनाशक टॉनिक इत्यादी ची फवारणी करणे,पिकाला पंप ने फवारणी करणे,पिकाला ड्रिंचिंग,रोटर करणे, पिकाला माती लावणे, सरी ओढणे ,ड्रीप अंथरणी करणे,खत पेरणे, विविध पिकांची पेरणी करणे,अशे अनेक कामे हे यंत्र ऐकाच वेळी करू शकते,

त्यामुळे शेती मशागती मध्ये लागणार वेळ वाचणार आहे, शेती कामाला गती येऊन शेतातील कामे जलद गतीने होतील तसेच या यंत्रमध्ये सेन्सर चा वापर केल्यामुळे वरील कामांना कौशल्यता प्राप्त होऊन प्रॉपर पद्धतीने कामे सर्व कामे होत असल्यामुळे शेती निविष्टांमध्ये बचत होते आणि उत्पादन वाढीस मदत होते, जसे की या यंत्रच्या सहाय्याने ड्रिंचिंग केली असता किंवा खत पेरणी केली तर ते जमिनीत माती आड होणे,ट्रॅक्टर च्या गतीनुसार फवारणी स्प्रे गती ठरवता येणे इत्यादी तसेच हे सर्व कामे ऐकाच वेळी होत असल्यामुळे इंधन ची बचत होऊन शेतीवर होणारा खर्च कमी होऊन पर्यावरण चे सौरक्षण होण्यास मदत होईल,व या यंत्रच्या वापरामुळे शारीरिक कष्ट कमी झाल्यामुळे मजुरांची आवश्यकता भासणार नाही असे ते म्हणाले, याच समस्यानावर मात करण्यासाठी, वेळेवर कामे होण्यासाठी, कामात गती येण्यासाठी, मजुरांची वाढती टंचाई, शेतीवर होणार वाढता खर्च, ऐकच शेती कामे करण्यासाठी सारखं सारखं पिकात जावा लागत असल्यामुळे व अकुशल होणारी शेती कामे थांबवण्यासाठी हे मुख्य उद्धीष्ट डोळ्यासमोर ठेऊन त्यांनी या यंत्रची निर्मिती केली असेल ते म्हणाले हे यंत्र तयार करताना त्यांना कृषी महाविद्यालय बदनापूर चे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. राकेश अहिरे सर कृषी अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख शास्त्रद्य डॉ. संजय सुपेकर सर,कृषी विज्ञान केंद्र खामगाव चे प्रमुख डॉ. दीप्ती पटेगावकर मॅडम, पाणी फौंडेशन चे शिवलेश्वर मेदने सर प्रगतशील शेतकरी दत्ता जाधव,श्रीकांत कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.सौरभ हे सध्या कृषी पदवीधर आहेत,तसेच ते बँक मध्ये नोकरीला आहेत परभणी विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या कृषी महाविद्यालय बदनापूर येथे त्यांनी कृषी पदवीचे शिक्षण घेतले, लहानपणापासूनच असणारी शेतीची आवड आणि शाश्त्ररोक्त असणारा शेतीचा अभ्यास यातून हे सध्य झालं आहे, तसेच त्यांचे शेती मध्ये नवनवीन प्रयोग सुरूच असतात, त्यांनी शेतकऱ्यांचा गट स्थापन करून महाबीज सोयाबीन ,पाणी फौंडेशन फार्मर कप स्पर्धा, इत्यादी मध्ये त्यांचा सहभाग आहे

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना दिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयात बीड सेक्टर व ५१ महाराष्ट्र बटालियन छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ७६ व्या राष्ट्रीय छात्र सेना दिना निमित्त ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, एनसीसी संघटन हे शिस्त व एकतेची बुनियाद आहे. एनसीसीच्या विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य व पोलीस दलामध्ये



सेवा करण्याची संधी एनसीसी मुळे निश्चितच प्राप्त होते.एनसीसी प्रशिक्षणाच्या द्वारे तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये विद्यार्थ्यांना अनुशासन, नेतृत्व, चारित्र्य, धर्म सहिष्णुता, खेळाडू वृत्ती, सामाजिक सेवा या जीवन मूल्यांचे प्रशिक्षण विविध प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून व संस्थात्मक प्रशिक्षणाद्वारे दिले जाते. या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी निश्चित फायदा भविष्यातील परीक्षासाठी करून घेतला पाहिजे.एनसीसी द्वारे विविध समाज उपयोगी व राष्ट्रीय एकात्मतेचे कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातात अशा कार्यक्रमांमध्ये एनसीसी कॅडेटसने उत्साहाने सहभाग घेऊन आपले योगदान दिले पाहिजे असे आवाहन याप्रसंगी एनसीसी कॅडेट्स ना करण्यात आले. भारतीय सैन्य व पोलीस दलात कार्य करत असताना वर्दीमुळे समाजामध्ये सातत्याने सन्मान प्राप्त होतो याचा विद्यार्थ्यांना निश्चितच कायम आनंद वाटत असतो. समाजाकडून मिळणाऱ्या सन्मानामुळे निरंतर देश सेवेसाठी समर्पण करण्याचे प्रोत्साहन मिळत राहते. त्यामुळे आपल्या सारख्या तरुणांनी कायम राष्ट्रीय एकता व अखंडतेसाठी आपले योगदान दिले पाहिजे असे शेवटी आवाहन कॅडेट्सना करण्यात आले आणि पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी एनसीसी बीड सेक्टर चे प्रमुख कॅप्टन डॉ. बी.टी.पोटे, लेफ्टनंट डॉ.शैलेश अकुलवार, लेफ्टनंट डॉ.जगन्नाथ चव्हाण, सेकंड ऑफिसर प्रदीप राठोड , थर्ड ऑफिसर नितीन जाधव, थर्ड ऑफिसर विकास झुंजुर्के यासोबत एनसीसी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांचा पुष्पगुच्छ देऊन नवनाथ शिराळे यांनी केला सत्कार

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभेचे कर्तव्यदक्ष आणि कर्तबदार तरुण तडफदार गेवराई विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार मा श्री आमदार विजय जी राजे पंडित साहेब हे भरघोस मतांनी गेवराई विधानसभेच्या मतदारसंघातून विजयी झाले असता त्यांना भेटण्यासाठी मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील हे आज बीड येथील आमदार साहेबांच्या निवासस्थानी श्री शिवछत्र या ठिकाणी गेले असता त्या ठिकाणी आमदार साहेब हे मुंबईच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुंबईला रवाना झाले असल्यामुळे त्या ठिकाणी भ्रमर धोनी वरून मा श्री नवनाथ जी



शिरोळे पाटील यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातून विक्रमी मताने ज्यांच्या नावातच विजय आहे असे विजय झालेले माननीय श्री आमदार विजय जी राजे पंडित साहेब यांना मनस्वी शुभेच्छा दिल्या त्यानंतर शिवछत्र बीड येथे उपस्थित असलेले माजी मंत्री मा श्री शिवाजीराव दादा पंडित साहेब यांचा पुष्पगुच्छ देऊन भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड जिल्ह्याचे उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी मनस्वी सत्कार केला या प्रसंगी मान्यवर उपस्थित होते .

# तीन डिसेंबर रोजी राज्यात 'पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांचे' आयोजन

## दहा हजार पत्रकारांची होणार आरोग्य तपासणी

मुंबई :

३ डिसेंबर १९३९ रोजी मराठी पत्रकार परिषदेची मुंबईत स्थापना झाली.. मराठी पत्रकार परिषदेचा हा स्थापना दिवस राज्यात गेली दहा वर्षे "पत्रकार आरोग्य दिन" म्हणून साजरा केला जातो..या दिवशी स्थानिक डॉक्टर्सच्या मदतीने पत्रकारांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले जातात.. गंभीर आजाराचा रूग्ण सापडल्यास त्यास मुंबईस पाठवून त्याच्यावर उपचार केले जातात.. गेल्या वर्षी पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांना राज्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.. राज्यातील २६५ तालुक्यात ही शिबिरं झाली.. त्यात १०,००० पेक्षा जास्त पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी करण्यात आली.. हा जागतिक विक्रम होता..

दरवर्षी प्रमाणे यंदा देखील मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनी म्हणजे ३ डिसेंबर २०२४ रोजी राज्यात पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरं घेण्यात येणार आहेत.. राज्यात ३५४ तालुके आहेत या सर्व तालुक्यात पत्रकार आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.. स्थानिक पत्रकारांनी पुढाकार घेऊन ही शिबिरं यशस्वी करावीत असं आवाहन एस.एम देशमुख यांनी केलं आहे..

पत्रकारांचं आयुष्य दगदगीचं असतं.. जागरण, अवेळी जेवण, तणाव या सर्वांचा पत्रकारांच्या प्रकृतीवर परिणाम होत असतो.. मात्र हे दुखणे अनेकदा अंगावर काढले जाते.. विषय हाताबाहेर जातो तेव्हा वेळ निघून गेलेली असते.. अशी वेळ कोणत्याच पत्रकारावर येऊ नये यासाठी मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते.. ..त्यासाठीच ही शिबिरं होत आहेत.. स्थानिक पातळीवर सर्व पत्रकारांनी एकत्र येत शिबिरं यशस्वी करावीत असं आवाहन परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी यांनी केले आहे..

# बीडमध्ये हेरीटेज वॉक उत्साहात

बीड । प्रतिनिधी

सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांत व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक वारसा सप्ताह निमित्त दिनांक २३ नोंव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील कंकालेश्वर मंदीर येथे हेरीटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी पुरातत्व विभाग,छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.कामाजी डक सर यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचबरोबर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतच्या महिला विभाग प्रमुख आणि आणि श्याम गदळे कला व विज्ञान





महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.शांता जाधवर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.अनिता शिंदे यांची देखील उपस्थिती होती.यावेळी डॉ.कामाजी डक सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आपला वैभवशाली वारसा सध्या नष्ट होत चालला आहे. तरी या सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी हा वारसा जपण्यासाठी पुढे आले पाहिजे.आपल्या परिसरातील असलेला वैभवशाली ठेवा आपण जपला पाहिजे.मार्गदर्शिका डॉ.शांता जाधवर यांनी विद्यार्थ्यांना कंकालेश्वर मंदीरातील द्वार शाखा, सभामंडप, गर्भगृह,सभामंडपात कोरलेल्या मूर्त्या आणि स्तंभ याची विस्तृत माहिती दिली.त्याचबरोबर मंदीरावर असलेले दशावतार, कंकाल, मातृशक्ती आणि इतर मूर्त्यांची माहिती सांगितली. ही माहिती ऐकून अनेक विद्यार्थ्यांमध्ये कला आणि मूर्तीशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली.

याप्रसंगी इनटॅक छत्रपती संभाजीनगर येथील अमित देशपांडे हेही उपस्थित होते.सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्रा.संजय काळे, इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतचे सचिव प्रा.शशिकांत पसारकर यांची यावेळी उपस्थिती होती. सौ.के. एस.के. महाविद्यालयातील एकूण एकवीस विद्यार्थी, विद्यार्थिनी या हेरीटेज वॉकमध्ये सहभाग घेतला. या उपक्रमा बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.काकडे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी अभिनंदन केले.

पान ६ वरून...

## महायुतीच्या अभूतपूर्व विजयाचा

केले. त्यानंतर हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फाटक्यांची आतषबाजी करत शिवसेनेचा जयघोष केला तसेच सर्वांनी मिठाई वाटून आनंदत्सव साजरा केला. मा.मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व लाडके शिवसैनिक यांच्या कष्टातून विधानसभा निवडणुकीत आपणांस भरघोस यश मिळाले असल्याच्या भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या. या निमित्ताने सायंकाळच्या दरम्यान शिवसैनिक तथा महिला भगिनींनी पणती व दिवे प्रज्वलीत केले तसेच विविध मंदिरात देखील शिवसैनिकांनी देवी देवतांच्या चरणी नतमस्तक होऊन आरत्या केल्या व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शाम भाऊ पडूळे, शिवसेना जेष्ठ नेते सुरेश तात्या शेटे, महिला आघाडी जिल्हा सहसंपर्कप्रमुख डावकर ताई, शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, शिवसेना तालुका संघटक गणेश मस्के, सुदर्शनजी धांडे, सुनील गवते, गजानन कदम, शिवसेना शहर संघटक नवनाथ शिंदे, शिवसेना शहर सह संघटक ऋषिकेश जोगदंड, शिवसेना उप शहर प्रमुख हनुमानप्रसाद पांडे, शिवसेना उपशहर प्रमुख अक्षय काशीद, माजी सरपंच संदीपान बडगे, शिवसेना विभाग प्रमुख सदाशिव सुर्वे , शिवसेना विभाग प्रमुख शहर रणजीत बुंदिले, सरपंच अंकुश गायकवाड,अमोल मामा जाधव, उत्कर्ष धपाटे, गणेश काळे, अनिल खांडे, अविनाश पाटोळे,तुकाराम गोरे, गणेश डांगे, राहुल कोकाटे, अजय सुरवसे, प्रताप जगताप, गणेश काळे व आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबच असावेत- अनिलदादा जगताप

तळागाळातील माणसांची जान असणारे सर्व सामान्यांचे नेतृत्व म्हणून अवघ्या महाराष्ट्रभरातील जेष्ठ, तरुणाई, शेतकरी, कष्टकरी, महिला भगिनी यांच्यात आमचा सक्षम आधार अशी विश्वास निर्माण करणारे शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश प्राप्त केले असून आता शिंदे साहेबच महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी सर्वोपरी योग्य चेहरा आहे व शिंदे साहेबच पुन्हा मुख्यमंत्री बनावेत अशी भावना शिवसैनिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे व राज्याच्या विकासाठी शिंदे साहेबांच्याच हातात मुख्यमंत्री पदाची धुरा द्यावी अशी एक शिवसैनिक म्हणून महायुतीच्या जेष्ठ श्रेष्ठींना विनंती आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपली भावना व्यक्त केली.

## जिल्ह्यातील ३२ कृषी

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची राहणार आहे. जरी सार्वजनिक शौचालय हे प्रकल्पाच्या ठिकाणी असतील तरी याचा वापर सर्वसामान्य जनतेसाठी करून देणे बंधनकारक राहणार आहे. त्यानंतर १८ /१०/ २०२४ रोजी दिलेल्या पत्रात त्यांनी या प्रकल्पाला १५ नोव्हेंबर २०२४ ऐवजी जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

या संदर्भात स्मार्ट चे प्रकल्प संचालक डॉक्टर हेमंत वसेकर यांनी संबंधित विभागाच्या नोडल अधिकाऱ्यांना एक पत्र देऊन या ६१० शेतकरी उत्पादक कंपन्याकडे उभारण्यात येणाऱ्या शौचालयाचा लाभ देण्यासाठी याचा पाठपुरावा स्वच्छ भारत मिशन कडे करावा आणि या शेतकरी उत्पादक कंपन्यांना यासाठी प्रवृत्त करून संबंधित विभागाला प्रस्ताव देण्यासाठी प्रयत्न करावेत असे म्हटले आहे .यासाठी स्वच्छ भारत मिशन ७० टक्के रक्कम

पान ६ वरून...

देणार असून ही रक्कम दोन लाख दहा हजार एवढी होते. उर्वरित रक्कम ही १५ व्या वित्त आयोगातून देण्यात यावी आणि आराखड्यामध्ये याचा समावेश झाला नाही तर आणि आयोगाचा निधी मिळाला नाही तर ही रक्कम संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्यांनी भरावी असेही नमूद केले आहे.

शेतकरी उत्पादक कंपन्यांना स्वच्छ भारत मिशन मधून सार्वजनिक शौचालय देण्यात यावीत अशी मागणी बीड जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी बी.एस. नितनवरे यांनी केली होती. या संदर्भात त्यांनी १९/ ९ /२०२४ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देऊन स्वच्छ भारत मिशन अभियानांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना शौचालय बांधकामासाठी निधी द्यावा अशी मागणी केली होती. या मागणीनुसार बीड जिल्ह्यातील ३२ शेतकरी उत्पादक कंपन्यांना याचा लाभ मिळणार आहे. या शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये बीड तालुक्यातील १२, केज तालुक्यातील ५ ,अंबाजोगाई तालुक्यातील २, परळी तालुक्यातील १, माजलगाव तालुक्यातील १, गेवराई तालुक्यातील ६, आष्टी तालुक्यातील १, पाटोदा तालुक्यातील २, शिरूर तालुक्यातील २ तर वडवणी तालुक्यातील एका शेतकरी उत्पादक संस्थेचा समावेश आहे.

## लोकशाही दिनाचे

मुदती व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज :.. या संकेस्थळावर उपलब्ध असल्याचे उपजिल्हाधिकारी (सामान्य) नम्रता चाटे यांनी कळविले आहे.

## शिरूर तालुक्यात आ.पंकजा

निकाल लागल्यानंतर आलेल्या मतदान यादीनुसार शिरूर कासार तालुक्यातील तडगव्हाण, राळेसांगवी, घोगस पारगाव, श्रीपतवाडी ,पारगाव ,मानुर, वारणी, लोणी, बारगजवाडी ,बडेवाडी, जाटवड, पिंपळनेर या गावामध्ये आ.पंकजाताई मुंडे समर्थकाचा मोठा प्रभाव असताना त्या ठिकाणी मतदान भाजपचे उमेदवार सुरेश (अण्णा )धस यांच्या विरोधात गेले कसे? आणि कोणाच्या आदेशावरून अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांच्या पारड्यात पडले आहे. यावरून असे स्पष्ट होते आ. पंकजाताई मुंडे यांच्यावरील या समर्थकांनी आपापल्या गावांमध्ये आणि परिसरामध्ये ओबीसी फॅक्टर च्या नावाखाली अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना मोठी लिड मिळवून दिली आहे. निवडणूक प्रचारादरम्यान पंकजा मुंडे समर्थक यांच्याकडून सुरेश धस हा देवेंद्र फडवणीस यांचा उमेदवार असल्याचे सांगून त्यांच्या विरोधात प्रचार यंत्रणा राबवण्यात आली होती यामुळे या प्रचाराचा सर्वाधिक फायदा बंडखोर उमेदवार भीमराव धोंडे यांना झाला.

## वाचाळ वीरांवर गुन्हा

आ.सुरेश धस यांची बदनामी केलेली आहे.भावना दुखवल्या आहेत. त्यामुळे अशा वक्तव्य करणाऱ्या सर्व संबंधीतांवर सायबर ॲक्टनुसार गुन्हे दाखल करून अटक करावी.भारतीय संविधानाने कलम १९ नुसार अभिव्यक्ती स्वतंत्र दिले आहे. त्यानुसार आमदार सुरेश धस यांनी विजयी सभेत संवैधानिक भाषेत आपले मत व्यक्त केलेले आहे. परंतु पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते समर्थक समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे कृत्य करत आहेत.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांबद्दल बोलताना जी संस्कृती व परंपरा घालून दिलेली आहे त्याच महाराष्ट्रात महिलेबद्दल असे अश्लील भाषेत बोलणाऱ्या गावगुंडावर तात्काळ गुन्हे दाखल करन अटक करावी अन्यथा आष्टी तालुका बंदची हाक देत आहोत.तात्काळ कारवाई न झाल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी असे निवेदनात नमूद केले आहे यावेळी पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# मका दरात काहिशी सुधारणा

सोयाबीन बाजारभाव सध्या दबावातच आहेत. सोयाबीनला आजही हमीभावापेक्षा किमान ८०० रुपये कमी भाव मिळत आहे. कारण राज्यात आज सोयाबीनचा सरासरी बाजारभाव ४ हजार १०० रुपये होता. तर प्रक्रिया प्लांट्सचे खरेदीचे भाव ४ हजार ४०० ते ४ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान होते.एनसीडीईएक्सच्या खेरदी केंद्रांवरही सोयाबीन आज ४ हजार ४०० रुपयांच्या दरम्यान राहिले. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोयाबीन आणि सोयापेंडचे वायदे दबावातच आहेत. सोयाबीन बाजारातील ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

कापसाचे भाव दबावातच आहेत. दुसरीकडे बाजारातील आवक दिवसेंदिवस वाढत आहे. निवडणुकीनंतर बाजारातील आवक वाढल्याचे दिसत आहे. मात्र भावपातळी कमीच आहे. आजही देशातील बाजारात कापसाला सरासरी ६ हजार ७०० ते ७ हजार २०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला.तर वायद्यांमध्ये जानेवारीच्या सौद्यांमध्ये कापसाला ५६ हजार १०० रुपये प्रतिखंडीचा भाव मिळाला. बाजारातील कापसाची आवक यापुढच्या काळात चढी राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे कापूस बाजारातील चढ उतार कायम राहण्याचा अंदाज आहे.



मक्याच्या दरात काहिशी सुधारणा

बाजारातील मक्याची आवक स्थिरावली आहे. तर दुसरीकडे मक्यामधील ओलावा कमी झाला. त्यामुळे मक्याच्या भावात मागील ८ दिवसांच्या काहिशी सुधारणा दिसून येत आहे. मक्याचा सरासरी भाव राज्यात सध्या २ हजार १०० ते २ हजार २०० रुपये दिसून येत आहे.मात्र ओलावा अधिक असलेल्या मालाला आजही कमी भाव मिळत आहे. त्यामुळे किमान भावपातळी आजही १८०० रुपये दिसत आहे. यापुढील काळात मक्याची आवक स्थिर राहण्याची शक्यता आहे. तर मक्याला उठाव चांगला आहे. त्यामुळे मक्याचे बाजारभाव टिकून राहतील, असा अंदाज मका बाजारतील अभ्यासकांनी व्यक्त केला.

तिळाच्या भावात मागील काही दिवसांमध्ये अनेक बाजारात काहिशी नरमाई दिसून आली. देशातील काही भागांमध्ये बाजारात तिळाची आवक वाढत आहे. त्यातच सध्या तिळाला उठाव कमी झालेला दिसत आहे. त्यामुळे तिळाच्या भावावर काहिसा दबाव दिसून येत आहे. सध्या तिळाला बाजारात सरासरी ११ हजार ते १३ हजार रुपयांच्या दरम्यान गुणवत्तेप्रमाणे भाव मिळत आहे. पुढील काळात तिळाची आवक आणखी वाढण्याचा अंदाज आहे, असे तीळ बाजारातील व्यापाऱ्यांनी सांगितले.देशातील बाजारात हरभरा दरात नरमाई दिसून आली. हरभरा भाव उच्चांकी दरावरून अपेक्षेपेक्षा कमी झाले, असे व्यापारी सांगत आहेत. हरभरा भावावर पिवळा वाटाणा आयातीचा परिणाम होत आहे. पिवळा वाटाणा स्वस्त असल्याने हरभरा भावही कमी होण्याला मदत झाली. देशातील बाजारात हरभरा भाव सध्या ६ हजार २०० ते ६ हजार ६०० रुपयांच्या दरम्यान होते. हरभरा भावात पुढील काळात काहीशी सुधारणा अपेक्षित आहे, असे हरभरा बाजारातील अभ्यासकांनी सांगितले.

## वेलवर्गीय पिकांवरील किड आणि नियंत्रण



वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये मोझॅक, ग्रीन मोटल मोझॅक, यलो व्हेन मोझॅक, वॉटरमेलॉन बड नेक्रॉसीस, फायलोडी इ. विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो.

कुकुंबर मोझॅकचा प्रसार मावा किडीमुळे होतो. हा विषाणू माठ, रानपोपटी, कांगुणी गवतावर; तसेच टोमॅटो, मिरची, वांगी, पालक, चवळी, गाजर या सहजीवी पिकांवर असतो. कलिंगड आणि भोपळ्यावरील ग्रीन मोटल मोझॅकचा प्रसार संसर्ग, बियाण्याद्वारे होतो. तसेच हा रोग चंदनबटवा, धोतरा गवतावर व सहजीवी पिकांवर असतो. कारली, खरबूज, कलिंगड, भोपळा यावरील मोझॅक स्पर्श, मावा किडीमार्फत पसरतो. यलो व्हेन मोझॅक पांढरी माशी व स्पर्शाने; तर कलिंगडामधील बड नेक्रोसीसचा प्रसार फूलकिडे व स्पर्शाने होतो. कुकुरबीट फायलोडीचा प्रसार तुडतुड्यांमार्फत होतो. विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास, विशेषतः नवीन पानावर हिरवट डाग दिसून येतात व पानाचा इतर भाग पिवळसर दिसतो. पाने वाकडी होवून गुंडाळली जातात. ती लहान होतात. पानाच्या शिरा पिवळसर होतात. कांडे आखूड राहते. नवीन फळे वेडीवाकडी, लहान, हिरवट-पिवळसर आणि राठ दिसतात. झाडाची वाढ खुंटते. फुले-फळे कमी प्रमाणात लागतात. कलिंगडामध्ये बड नेक्रॉसीसमुळे वेलीचा शेंडा तपकिरी पडून शेवटी काळा होऊन वेल जळते. वेलीवर शेंड्याकडून खोडाकडे तपकिरी चट्टे पडतात. रोगाचा प्रादुर्भाव फळांवर येऊन त्यावर गोलाकार वर्तुळे दिसतात.

उपाययोजना : विषाणूजन्य रोग असलेल्या सहजीवी पिकांचा नायनाट करावा. निरोगी झाडांवरील फळांचे किंवा प्रमाणित बी वापरावे.रोगांचा प्रसार करणाऱ्या किडींचे शिफारशीत कीडनाशक वापरून वेळीच नियंत्रण करावे. रोगट झाडे दिसताच त्यांचा उपटून नायनाट करावा.

# नारळ शेतीतील संधी आणि नारळाच्या उत्पादनाचे महत्त्व

जर आपण नारळ शेतीचा विचार केला तर पटकन आपल्या डोळ्यासमोर येते ती कोकण किनारपट्टी व त्याठिकाणी असलेले नारळाच्या बागाच बागा. परंतु आता बहुतेक ठिकाणी नारळाची लागवड ही महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांमध्ये थोड्याबहुत प्रमाणात होऊ लागले आहे.

अजूनही लागवडीचे प्रमाण कमी आहे परंतु सुरुवात होत आहे हे महत्त्वाचे आहे.जर आपण नारळ शेतीतील संधीचा विचार केला तर वर्षभर मागणी असणारे नारळ हे शेतकऱ्यांसाठी एक चांगला आर्थिक उत्पन्नाचा दीर्घकालीन स्त्रोत बनू शकतो. जर आपण नारळाच्या आरोग्यदायी गुणधर्मांचा विचार केला तर त्यातील पाण्यामध्ये सोडियम, कॅल्शियम, पोट्याशियम, मॅग्नेशियम तसेच फॉस्फरस, लोह, तांबे तसेच क्लोरीन, विटामिन सी व सल्फर तसेच ब जीवनसत्त्वे मोठ्या प्रमाणात असतात. नारळाच्या पाण्यामध्ये तहान भागवण्याचा गुणधर्म तर आहेच परंतु शरीरात असलेला ताप दूर करण्यासाठी देखील महत्वाचे गुण त्यामध्ये आहे. त्यामुळे नारळाला खूप मोठी मागणी असते. एवढेच नाही तर आपल्याला माहित आहे की धार्मिक कार्यक्रमाच्या ठिकाणी किंवा धार्मिक प्रसंगी नारळाची आवश्यकता असतेच असते.



नारळ पाणी एक महत्त्वाचे उत्पादन


संपूर्ण देशभरात नारळाच्या पाण्याला मागणी असून देशातील कुठल्याही भागांमध्ये नारळ पाण्याची विक्री खूप मोठ्या प्रमाणात होते. जर आपण दक्षिण भारताचा विचार केला तर या ठिकाणी नारळाच्या बागा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्या ठिकाणी त्यावर प्रक्रिया करून बाटल्यांमध्ये नारळ पाणी विकले जाते. यासाठी उत्तम प्रतीचे हिरवेगार नारळ निवडले जाते व प्रक्रिया युनिटमध्ये नेऊन पाणी बाहेर काढले जाते व नंतर ते फिल्टर करून बाटल्यांमध्ये पॅकिंग केले जाते. बाटलीबंद नारळाच्या पाण्याचे मार्केटिंग करणे तसे अवघड आहे, परंतु नारळाचे पाणी जवळपास सर्वत्र सहज उपलब्ध होते व हळूहळू त्याची बाजारपेठ तयार होत आहे. नारळ पाण्याचे निर्यात देखील आता वाढत असून युरोपीय देश तसेच आखाती देशांमध्ये व अमेरिकेत देखील नारळ पाण्याची निर्यात वाढत आहे. नारळाचे इतर भाग देखील महत्वाचे असून त्यापासून नारळाचे पावडर, नारळाचे दूध तसेच दुधाची पावडर, कॉयर फायबर आणि कोकोपीट सारखी उत्पादने तयार केली जातात व त्यापासून उत्तम प्रतीचे दोरखंड देखील बनवले जाते. या शेतीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या माध्यमातून शेतकऱ्यांना वर्षभर चांगले उत्पन्न मिळू शकते. समजा तुमच्या शेतामध्ये दहा-बारा जरी नारळाची झाडे असतील तर नारळ सतत वाढत राहते व ते विकून तुम्हाला निश्चित उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे शेतकरी बांधव शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोतासाठी नारळाची लागवड करू शकतात.

# कोरडवाहू शेतीसाठी शून्य मशागत तंत्रज्ञान

कोरडवाहू शेतीत पावसाचे दिवस कमी असतात. एकावेळी भरपूर पाऊस पडतो, तर दोन पावसाचे सत्रास भरपूर अंतर पडल्याने काही काळ जास्त पाण्याने तर काही काळ ओलाव्याच्या दुर्भिक्षामुळे पिके वाळतात, उत्पादनातच घट येते अगर नापिकी होते. कोरडवाहू क्षेत्रात जमीन धारणा मोठी आहे. सेंद्रिय खताचा वापर करणे शक्य होत नाही. सेंद्रिय कर्बाची टक्केवारी कमी झाली आहे. यामुळे जमिनीची जलधारणशक्ती कमी आहे. बाहेरून संरक्षित पाणी देण्याच्या कोणत्याही सुविधा नाहीत. सरकार म्हणते या क्षेत्रात शेतकऱ्यांनी शेततळ्यांची सुविधा निर्माण करावी. त्यावर ठिबक चालवावे. परंतु केवळ थोड्या काळासाठी आणि क्रयशक्ती अभावी अशा योजना राबविणे शक्य नसते.

कोरडवाहू क्षेत्रात कापूस, तूर ही मुख्य लांब अंतरावरील पिके असून, त्यामध्ये मूग, उडीद, सोयाबीनसारखी कमी मुदतीची मिश्रपिके घेतली जातात. मुख्य पिकांची शाश्वती नसते, त्या ठिकाणी अल्प मुदतीचे मिश्र पिके तरी हाती लागावीत, हा उद्देश असतो. अशी पीक रचना उभी करण्यासाठी पूर्वमशागत करावी लागते. यामुळे बैल अगर ट्रॅक्टरचलित यंत्राने पेरणी करणे शक्य होते. खर्चिक तंत्रे या ठिकाणी उपयोगी नाहीत. त्यामुळे प्रथम बागायत क्षेत्रात शून्य मशागत शेती यशस्वी झाल्यानंतर या तंत्राचा लाभ कोरडवाहू क्षेत्राला कसा देता येईल, यावर चिंतन सुरू झाले.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रथम जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढविणे गरजेचे होते. पारंपरिक मार्गाने ही गोष्ट केवळ अशक्य होती. मग मागील पिकाचे जमिनीखालील अवशेष हेच पुढील पिकासाठी सेंद्रिय खत, हे शून्य मशागतीचे तंत्र या ठिकाणी बरोबर जमले. जमिनीखालील अवशेष कुजण्यास जड असतात. ते दीर्घकाळ जागेला कुजत राहिल्याने जमिनीची कण रचना सुधारली, निचरा शक्ती सुधारली, कमी वेळात जास्त पाऊस झाल्यास लवकर वापसा आल्याने त्याचा पिकाला त्रास झाला नाही. जमिनीत सेंद्रिय कर्बात वाढ झाली. यामुळे जलधारण शक्ती वाढली. दोन पावसाच्या सत्रात अंतर पडल्यास पिकाला गरजेइतके पाणी यातून उपलब्ध झाल्याने पीक २५ ते ३० दिवसांच्या काळात वाळले नाही. जमीन न नांगरता पेरल्याने पोकळ झाली नाही. नांगरून पोकळ केलेल्या जमिनीतील ओलावा जितका जलद उडून जातो तितका विना नांगरणीच्या बसलेल्या जमिनीतील उडून जाऊ शकत नाही. यामुळे पिकाला उघडिपीत दीर्घकाळ ओलाव्याची तरतूद झाली.



अस्थिर सेंद्रिय कर्बाची तरतूद –

जमिनीमध्ये स्थिर सेंद्रिय कर्ब आणि अस्थिर सेंद्रिय कर्ब उपलब्ध असतो. वरील तंत्रातून स्थिर सेंद्रिय कर्ब मिळाला. याचा फायदा झालाच, परंतु यापेक्षा जास्त फायदा मिळविण्यासाठी अस्थिर सेंद्रिय कर्बाची तरतूद करणे गरजेचे वाटले. यासाठी सहज कुजणाऱ्या पदार्थांची उपलब्धता करणे भाग होते. येथे ज्या जागी वापरायचा त्याच जागी तो निर्माण करण्याचे तंत्र विकसित करणे गरजेचे होते. लांब अंतरावरील कापूस व तूर या पिकात कोणतीही मिश्रपिक न घेता मुख्य पिकाला त्रास होणार नाही, असे युक्तीने तण वाढवायचे आणि योग्य वेळी एखाद्या अवजाराने झोपवून तणनाशकाने मारायचे असे सुरुवातीचे नियोजन होते. यातून विविध प्रकारच्या कच्च्या मालापासून अस्थिर सेंद्रिय खत निर्मिती होईल आणि आच्छादनामुळे जमिनीतील ओलावा जास्त काळ टिकून राहील. पारंपरिक पद्धतीत प्रथम डवरणी अगर कोळपणी आणि नंतर निंदणी अगर भांगलणी यातून शेती तणमुक्त करण्याची प्रथा आहे. इथे हाताच्या बोटाच्या चिमटीत तण धरणे शक्य झाले, की लगेच भांगलणी सुरू केली जाते. मी तणे शक्य तितकी मोठी करून (मुख्य पिकाला त्रास होणार नाही अशी) वाढवून मारण्याचे तंत्र विकसित केल्याने दोन पिकांच्या ओळीत तणाचा पट्टा तयार झाला. मध्यंतरी एखादा पाऊस झाल्यास या तणाच्या मुळांच्या जाळीत खूप मोठ्या प्रमाणावर पाणी साठविले जाते. जे पुढे पिकाची ओलाव्याची गरज ५० ते ६० दिवस सहज भागवू शकते. प्रत्येक पिकाला लागणाऱ्या पाण्याचे शेततळे त्याच्या मुळापाशी असा फायदा होतो. पिकाने आपल्या गरजेप्रमाणे त्याचा वापर करावयाचा. तणांच्या मुळांमुळे जमिनीची आपोआप मशागत होते. ओलावा दीर्घ काळ मिळणार असल्याने कोरडवाहूमध्ये लांब मुदतीच्या जातींची लागवड शक्य होते. तूर अगर कपाशी ही पिके अशी आहेत, की ज्याची ठरावीक वाढ झाल्यानंतर फूलधारणा व फळधारणा होते. यासाठी पिकाच्या उत्तर काळात ओलावा टिकणे गरजेचे असते. नेमका याच वेळेस पाऊस जातो आणि पिकाचे नुकसान होते. जमिनीत सेंद्रिय पदार्थ कुजविणारी जिवाणूसृष्टी वाढविणे हा सुपीकतेसाठी सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. या कच्च्या मालात सहज, मध्यम व दीर्घ मुदतीने कुजणारे पदार्थ असावेत. कुजविणाऱ्या जिवाणूसृष्टीपैकी जास्तीत जास्त प्रजातींना अन्न उपलब्ध झाल्याने जमिनीत जैववैविध्य पूर्ण क्षमतेने वाढते.

याचे फायदे अनेक आहेत. कपाशी व तूर या पिकाची सोटमूळे खोलवर जातात. काढणी पूर्ण झाल्यानंतर जमिनीबरोबर झाडे कापून काढावीत, मुळांचा पसारा तसाच ठेवावा. पुढील पीक तणाच्या पट्ट्यात घ्यावे आणि पिकाच्या पट्ट्यात तणाचा पट्टा करावा. कापलेली सोटमुळे परत फुटू लागल्यास तणनाशकाने मारावीत. पुढील वर्षी या खोलवर गेलेल्या मुळाला धरून जमिनीत पाणी खोलवर पाझरते. मूलस्थानी जलसंवर्धन होते, भूजल पाणीपातळीही वाढू शकते. एका ठिकाणी खूप मोठ्या क्षेत्रावर हा प्रयोग झाल्यास लांबकानी गावाप्रमाणे पुढील आठ महिन्यांतील पाणीटंचाईवर मात करता येऊ शकेल. यासाठी गावाची एकी हेच मुख्य भांडवल. शेतकऱ्यांना मध्यम मुदतीने काही पैसा गरजेचा असतो. म्हणून मिश्र पिकाचे नियोजन असते. मुख्य पिकात मिश्रपिक नको. मिश्र पिकासाठी काही क्षेत्र बाजूला ठेवा, त्याची वखराची पाळी देऊन पेरणी करा आणि नेहमीप्रमाणे व्यवस्थापन करून ते पीक घ्या. केव्हा तरी तणे व अवशेष कुजून तयार झालेले रान अल्प मुदतीच्या पिकाच्या फेरपालटासाठी बदलून वापरा. आपण एकाच दगडात अनेक पक्षी मारतो. हा झाला बदलातील पहिल्या काही वर्षांतील विचार. संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. यापेक्षा आणखी काही चांगले आहे का यासाठीची शोधयात्रा पुढे चालूच राहिली.पहिल्या टप्प्यात तण मोठे करून झोपवून तणनाशकाने मारावे असे म्हटले आहे. जुने तण असे मारण्यापेक्षा हे तण प्रथम कापून टाकावे, यासाठी ब्रश कटरचा वापर करावा. ज्यांचे क्षेत्र मोठे आहे त्यांच्यासाठी ट्रॅक्टरवर चालणारे ब्रश कटर आता उपलब्ध आहेत. पुढे येणाऱ्या कोवळ्या फुटीवर तणनाशक फवारणी करणे सोपे होते. हा झाला दुसऱ्या टप्प्यातील विचार. यापुढे हे तण न मारता जिवंत ठेवणे जास्त फायदेशीर आहे हा विचार पुढे आला. यामध्ये फक्त कापून तणाची वाढ खुंटविणे व मुख्य पिकाला वाढू देणे महत्त्वाचे होते. तण आणि पिकाचा रानात सहयोग असावा. दोघांनी एकमेकांशी स्पर्धा करून अन्नसेवन करावे.

शेती तणमुक्त ठेवल्यास पिकाचे फाजील पोषण होते आणि ते रोग किडीला बळी पडते. दोन पानांमधील खोडाची लांब जास्त लांब होत आहे, असे वाटल्यास ही वाढ सशक्त मानू नये, असे काही परस्पर विरुद्ध विचारावर चिंतन चालू आहे. शून्य मशागतीवर एकही तणनाशकाची फवारणी न करता हेक्टरी ४५ ते ५० क्किंटल विक्रमी पीक सातत्याने घेतल्याची उदाहरणे आहेत. बाकी मशागत करणारे शेतकरी तणनाशके फवारून बेजार झाले आहेत.

एका शेतकऱ्याने कळविले आहे, की नेहमी पावसाळ्याच्या अखेर विहिरीची पाणीपातळी १० ते १५ फूट खाली असायची. यंदा पाऊस कमी असून, विहीर काठोकाठ भरली आहे. हा काही चमत्कार नाही तर विज्ञान आहे. पारंपरिक शेतीतील पद्धतीच्या परस्पर विरोधी विचार असल्याने शेतकरी वर्ग तंत्र स्वीकारण्यात अडखळतात. परंपरावाद्यांचा विरोध हा मोठा अडथळा आहे. प्रथम थोड्या क्षेत्रावर प्रयोग करून या विषयातील तज्ज्ञता प्राप्त करावी हा यावरील मार्ग आहे. आपल्याला स्वतःच्या पायावरच उभे राहण्यास शिकले पाहिजे.




## जागतिक दिवस: शाकाहार दिन

### महत्वाच्या घटना

१६६४ : छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याचा पाया घातला.
१७५८ : ब्रिटन या देशाने आजच्याच दिवशी फ्रांस च्या डोक्विन्सोन या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून किल्ला काबीज केला होता.
१८६७ : अल्फ्रेड नोबेल या शास्त्रज्ञाने आजच्या दिवशी डायनामाईट चे पेटंट केले होते.
१९२२ : मधुमेह या आजारावरील इन्सुलिन चा शोध फ्रेडरिक बँटिंगनी यांनी जाहीर केला.
१९४१ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशाला फ्रांस या देशाकडून स्वातंत्र्य मिळाले होते.
१९४८ : नेशनल कॅडेट कोर्सची स्थापना.
१९६५ : आजच्याच दिवशी फ्रांस या देशाने स्वतःचा पहिला उपग्रह अवकाशात सोडला होता.
१९७५ : सुरीनामला नेदरलँड्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९७५ : सुरीनामला (नेदरलँड्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८१ : अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमवर पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला गेला.
१९९१ : कमल नारायण सिंग यांनी भारताचे २२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९४ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना कलकत्ता येथील 'इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन'तर्फे देण्यात येणारा 'राज क्रिस्टो दत्त स्मृती पुरस्कार' जाहीर
१९९९ : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांना 'इंदिरा गांधी शांतता पुरस्कार' जाहीर
२००० : सतारवादक उस्ताद अब्दुल हलीम जाफर खाँ यांना मध्यप्रदेश सरकारचा 'तानसेन सन्मान' जाहीर
२००१ : आजच्याच दिवशी वरिष्ठ पाकिस्तानी राजनेता बेनजीर भुट्टो या तत्कालीन भारतीय प्रधानमंत्रीअटल बिहारी वाजपेयीयांना दिल्ली येथे भेटल्या होत्या.
२००२ : लुसिया गुटेरेज आजच्याच दिवशी इक्काडोर या देशाचे राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४१ : जर्मन गणितज्ञ आर्न्स्ट श्रोडर यांचा जन्म.
१८४४ : मर्सिडीज-बेंझ चे संस्थापक कार्ल बेंझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १९२९)
१८७२ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम नाटककार व पत्रकार, 'केसरी'चे संपादक, 'नवाकाळ'चे संस्थापक (मृत्यू: २६ ऑगस्ट १९४८)
१८७९ : साधू वासवानी आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८८२ : सावळाराम लक्ष्मण हळदणकर चित्रकार (मृत्यू: ३० मे १९६८)
१८८९ : आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ साधू वासवानी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८९० : प्रसिध्द साहित्यकार सुनीती कुमार चाटर्जी यांचा जन्म झाला होता.
१८९८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक देबाकी बोस यांचा जन्म.
१९८२ : प्रसिध्द भारतीय महिला क्रिकेट खेळाडू व वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी हिचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.
१९८३ : भारतीय क्रिकेटर झुलन गोस्वामी यांचा जन्म.
१९२१ : नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२६ : रंगनाथ मिश्रा भारताचे २१ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १३ सप्टेंबर २०१२)
१९३५ : महाराष्ट्रीय हॉकीपटू गोविंद सावंत यांचा जन्म.
१९३७ : शिक्षणतज्ज्ञ साधू वासवानी यांचा जन्म.
१९३९ : उस्ताद रईस खान मेवाती घराण्याचे गायकी अंगाने वाजवणारे सतारवादक
१९५२ : इम्रान खान पाकिस्तानी क्रिकेटपटू व राजकारणी
१९६३ : लोकसभा सदस्य अरविंद कुमार शर्मा यांचा जन्म झाला होता.
१९६९ : त्रिपुरा राज्याचे १० वे मुख्यमंत्री विप्लव कुमार देव यांचा आजच्या दिवशी जन्म झाला होता.
१९७२ : भारतीय क्रिकेटपटू दीपा मराठे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८५ : अल्फान्सो (बारावा) स्पेनचा राजा (जन्म: २८ नोव्हेंबर १८५७)
१९२२ : पांडुरंग दामोदर गुणे प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ व साहित्यसमीक्षक (जन्म: २० मे १८८४ राहुरी, अहमदनगर, महाराष्ट्र)
१९६० : अनंत सदाशिव अळतेकर प्राच्यविद्यापंडित (जन्म: २४ सप्टेंबर १८९८)
१९६२ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (जन्म: ६ जानेवारी १८६८ अकोळनेर, अहमदनगर)
१९७४ : यू. थांट संयुक्त राष्ट्रांचे तिसरे सरचिटणीस (जन्म: २२ जानेवारी १९०९)
१९८४ : यशवंतराव चव्हाण भारताचे ५ वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (जन्म: १२ मार्च १९१३)
१९८७ : परम वीर चक्र सन्मानित भारतीय सैनिक मेजर रामास्वामी पारामेस्वरण यांचे निधन झाले होते.
१९९८ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (जन्म: ४ सप्टेंबर १९१३ गुजरानवाला, पंजाब, पाकिस्तान)
२०१३ : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (जन्म: ५ सप्टेंबर १९२०)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, आणि कोरिओग्राफर सितारा देवी यांचे निधन. (जन्म: ८ नोव्हेंबर १९२०)
२०१६ : क्युबाचे क्रांतिकारक आणि पंतप्रधान फिडेल अलेहांद्रो कॅस्ट्रो रूझ यांचे निधन. (जन्म: १३ ऑगस्ट १९२६)

## रुग्णालयाच्या अग्निरोधक यंत्रणा, एमआरआय, कार्डियाक कॅथलॅबसाठी

# लक्ष्यवेधी शेकोटी आंदोलन






बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनिस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे प्रस्ताव ३ वर्षांपासून धुळखात पडुन असुन त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा तसेच जिल्हा रुग्णालयात एमआरआय,कार्डिअक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करावी तसेच माता- बालरुग्णालयाची ईमारत वापरात आणावी या विविध आरोग्य विषयक मागण्यांकडे जिल्हा व आरोग्य प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ सोमवार रोजी बीड जिल्ह्य रूग्णालय आवारात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनी पाठवलेल्या प्रस्तावाची होळी करून निषेध व्यक्त करण्यासाठी लक्ष्यवेधी ‘‘ शेकोटी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,मुबीन शेख , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक)आदी सहभागी होते.

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ ईतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक बसविण्यासाठी जिल्हा रुग्णालय प्रशासनाने शासनाला मार्च २०२२ मध्ये ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे अंदाजपत्रक पाठवत निधी आवश्यक असल्याने निधीची मागणी केली.या घटनेला ३ वर्षे उलटुनही निधी देण्याबाबत शासन स्तरावरून कुठल्याच हालचाली झाल्या नाहीत.तसेच जिल्हा नियोजन आयोगाकडून सुद्धा तरतूद करण्यात आली नाही.त्यामुळे शासन जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्ह्यातील आणि नोव्हेंबर २०२१मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील रुग्णालयातील आगीच्या घटनेसारखी वाट पहात आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अग्निरोधक यंत्रणेसाठी संस्थानिहाय लागणारा खर्च (अंदाजे) १) स्वराती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबेजोगाई १२ कोटी २) जिल्हा रुग्णालय बीड ५ कोटी ३३ लाख ३) आष्टी ग्रामीण रुग्णालय १ कोटी ४३ लाख ४) उपजिल्हा रुग्णालय केज ३ कोटी १४ लाख ५) परळी उपजिल्हा रुग्णालय २ कोटी ६) स्त्री रूग्णालय नेकनुर ९५ लाख ७) ग्रामीण रुग्णालय पाटोदा ३७ लाख ८)ट्रामा केअर सेंटर तेलगाव १६ लाख ९) ग्रामीण रुग्णालय नांदुरघाट ९७ लाख १०) ग्रामीण रुग्णालय धारूर १ कोटी ३९ लाख ११) ग्रामीण रुग्णालय तालखेड ९९ लाख ७० हजार १२) माजलगाव ग्रामीण रुग्णालय १ कोटी १३) ग्रामीण रुग्णालय रायमोह १३ लाख ३४ हजार १४) ग्रामीण रुग्णालय चिंचवण १३ लाख ३४ हजार १५) ग्रामीण रुग्णालय धानोरा १४ लाख १६) वृद्धत्व आरोग्य व मानसोपचार केंद्र लोखंडी सावरगाव ४ कोटी ४४ लाख १७) स्त्री रुग्णालय लोखंडी सावरगाव ७ लाख ३६ हजार १८) परिचर्या महाविद्यालय लोखंडी सावरगाव ३२ लाख ३४ हजार अशाप्रकारे एकुण ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची आवश्यकता असुन तातडीने त्याची तरतूद करण्यात यावी . बीड जिल्हा रुग्णालयाची स्थापना १९५० साली होऊनही रूग्णालयाला आता ७५ वर्षे होऊनही मेंदुतील ताप, शरीरातील धमन्या, अपघातात मेंदू व शरीरांतर्गत तपासणी करण्यासाठी आवश्यक एमआरआय सुविधा उपलब्ध नसुन रूग्णांना खाजगी दवाखान्यात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन रूग्णांना बाहेरून तपासणी करुन आणण्यात ‘‘गोल्डन आवर‘‘ वाया जात असल्याने वेळेवर उपचार होत नाहीत त्यामुळे रूग्ग दगावु शकतो त्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयात एमआरआय सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. जिल्ह्याच्या ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब मंजुरीच्या घोषणा अनेकवेळा करण्यात आल्या.३ वर्षांपूर्वी शासनाने निर्णय देखील घेतला मात्र जागा, उपकरणे व तज्ञ यामुळे अद्याप मुहूर्त लागलाच नाही.हृद्यविकाराच्या रूग्णांना वेळेत उपचार मिळणे आवश्यक असते.मात्र कार्डियाक कॅथलॅब नसल्याने रूग्णांना खाजगी रुग्णालयात लाखो रुपये मोजावे लागतात किंवा मृत्युला कवटाळावे लागते त्यामुळे कार्डियाक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करण्यात यावी.



मुंबई- येवला विधानसभा मतदारसंघातून सलग पाचव्यांदा प्रचंड बहुमताने विजयी झाल्याबद्दल छगन भुजबळ यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना राज्य अन्न आयोग महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत दिसत आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी मन की बात कार्यक्रमात नागरिकांनी सहभाग नोंदवला



धारुर। प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रम धारूर चे माजी नगराध्यक्ष व भाजपनेते स्वरूप सिंह हजारी यांनी भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक यांना एकत्रित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमात सहभाग नोदवला.

धारूर शहरातील कैप्टन राजपालसिंह भैया हजारी इंग्लिश स्कूल या ठिकानी दिनांक २४/११/२०२४ रोजी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदी साहेब यांचा मन की बात या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टी प्रदेष कार्यकारणी सदस्य तथा धारूर चे माजी नगर अध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी भाजपा यूवा मोर्च शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी नगर सेवक सचिन दुबे नगर सेवक एजाजभाई युवा नेते एडवोकेट साजेदभाई ज्येष्ठ नासेरखान ज्येष्ठ अहमद भाई आनंद खीडरे गुडु तंबोली संतोष सोनटके भालेराव व सर्व पधाधिकारी कार्यकरते उपस्थित होते

## बाल हक्क सप्ताहा निमीत्त जनजागृती शिबीर




बीड । प्रतिनिधी

आज दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ०९: ०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ‘‘बाल हक्क सप्ताहा निमित्त’’बालकांचे हक्क, सायबर क्राईम, व्यसनमूक्ती या विषयावर राजस्थानी विद्यालय सहयोगनगर बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, सोनी यांनी बालहक्क सप्ताहा निमित्त युनिसेफच्या गाईडलाईननुसार हा कार्यक्रम विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने घेण्यात येत आहे. बालकांचे हक्क समाजामध्ये प्रस्थापित झाले पाहिजेत यासाठी त्यांचे जनजागृती करणे गरजेचे आहे. तसेच, बालकांनी कायद्याची माहिती घेउन कायद्याचे पालन कटाक्षाने केले पाहिजे. ज्यामूळे कुठल्याही कायदेशीर प्रक्रियेत ते अडकणार नाहीत असे आवाहन सोनी यांनी बाल हक्क सत्पाहाच्या निमित्त मूलांना मार्गदर्शन केले.

बालकांनी मोबाईलचा वापर फार काळजीपुर्वक केला पाहिजे. कुठलाही संदेश कुठेही पाठवु नये. फेसबुक फ्रेंड कोणालाही करू नये. अनोळखी व्यक्तीसोबत मोबाईलवरून मैत्री वाढवुन चॅटिंग करू नये. वरील सर्व प्रकार केल्यामूळे मुले आणि मुली कायद्याच्या कचाट्यात सापडु शकतात त्यामूळे कायद्यात रहाल तर फायद्यात रहाल असा संदेश बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी बालसप्ताहानिमित्त बालकांना मार्गदर्शन करताना संदेश दिला. त्यानंतर विधीदुत तत्वशील कांबळे यांनी बालकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की व्यसनमुक्ती करणे हे खुप गरजेचे आहे. व्यसनामूळे समाज हा एकमेकांपासुन दुर चाललेला आहे, सामाजिक स्वास्थ्य बिघडत चाललेला आहे. यावर आळा घालण्यासाठी आपण स्वःत कुठलेही व्यसन केले नाही पाहिजे तसेच आपले कुटुंब व समाजातील इतर समाजाघटकांना त्यापासुन मुक्त केले पाहिजे असे मार्गदर्शन तत्वशील कांबळे यांनी केले. याप्रसंगी विधीदुत प्रा.मिथुन जोगदंड यांनीही विद्याश्र्याना मार्गदर्शकन केले. कार्यक्रमांचे प्रस्तावित हे शाळेच्या मुख्याध्यापिका कलंत्री यांनी केले, कार्यक्रमाचे सहसचिव किशोरकुमार बाहेती यानी विद्याथ्र्यांना मार्गदर्शन केले, तसेच कार्यक्रमाला उपस्थित राजस्थानी सेवा समाज अध्यक्ष विष्णुदास तापडिया यांनी भुषवले कार्यक्रमाचे सुंत्रसंचलन शर्मा यांनी केले तर आभार प्रदर्शन शेंलार यांनी केले. य ा कार्यक्रमाला राजस्थानी विद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येत उपस्थित होते.

## घाटपाटी ते राजमाता जिजाऊ महाविद्यालयापर्यंत गतिरोधक बसवा-गवळी



धारूर। प्रतिनिधी

खामगाव पंढरपूर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढली असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे वाहनांच्या वेगावर नियंत्रण बसवण्यासाठी शहरातून जाणाऱ्या महामार्गावर गतिरोधक बसवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरेश गवळी यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे केले आहे.

खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग दारू शहरातून गेला आहे या महामार्गावर वाहनांची पूर्वीपेक्षा अधिक गर्दी होत आहे हा महामार्ग शहराच्या रहदारीच्या ठिकाणा हून जात असल्याने नेहमीच अपघात होत आहेत यामध्ये अनेक नागरिकांना आपले प्राण देखील गमावे लागले आहेत तर काही लोकांना कायमचे अपंगत्व आले असल्याने हा महामार्ग धोकादायक ठरत आहे लोकांचे वाचवण्यासाठी व भविष्यात होणारे अपघात थांबवण्यासाठी महामार्गावर घाटपाटी ते राजमाता जिजाऊ महाविद्यालय या परिसरात येणारे रहदारीची ठिकाण म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, अहिल्यादेवी होळकर चौक, हुतात्मा स्मारक समोरील बाळासाहेब ठाकरे चौक छत्रपती संभाजी महाराज चौक, जय किसान चौक व जिजाऊ महाविद्यालय समोर या परिसरात शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने रहदारी असते अशा ठिकाणी गतिरोधक बसवण्याची मागणी शहरातील सामाजिक कार्यकर्ते सुरेश गवळी यांनी धारूर चे तहसीलदार यांना निवेदन देऊन केली आहे.


### जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए. बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३३२/२०२४**

**मधुकर व इतर १ वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत जनार्धन पिता किसनराव लांडगे मौजे जाधव गल्ली ता. धारुर जि. बीड हे दिनांक १४/०५/२००१ रोजी मौजे धारुर ता. धारुर जि. बीड येथे मयत झाल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र १ मधुकर पिता जनार्धनराव लांडगे, वय ६० वर्षे, धंदा सेवा निवृत्त व शेती रा. जाधव गल्ली धारुर ता. धारुर जि. बीड, अर्जदार क्र. २ अंतिकबाई भ्र. जनार्धन लांडगे, वय ८५ वर्षे, धंदा निरंक रा. जाधव गल्ली धारुर ता. धारुर जि. बीड यांनी अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आणि अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ व २ हे मयत जनार्धन पिता किसनराव लांडगे यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत जनार्धन पिता किसनराव लांडगे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १८/११/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : २१/१२/२०२४

स्वाक्षरित **सी. के. पवार** क. लिपिक | (शिक्का) | स्वाक्षरित **सहा. अधिक्षक** दिवार्णी न्यायालय क. स्तर, धारुर

### जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए.बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३२३/२०२४**

**गंगुबाई व इतर ५ वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत जगन्नाथ नानाभाउ सोळंके मौजे आमला ता. धारुर जि. बीड हे दिनांक ०८/११/२०२३ रोजी त्यांचे राहते घरी मौजे आमला ता. धारुर जि. बीड येथे मयत झाल्याचे नमूद केले आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ गंगुबाई भ्र. जगन्नाथ सोळंके, वय ७९ वर्षे, धंदा मजुरी रा. आमला ता. धारुर जि. बीड, अर्जदार क्र. २ ज्ञानेश्वर पिता जगन्नाथ सोळंके, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी रा. सदर, अर्जदार क्र. ३. नानाभाउ पिता जगन्नाथ सोळंके, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी रा. सदर, अर्जदार क्र. ४. व्दारका भ्र. माणिकराव यादव, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम रा. तळेगाव घाट, हतोळा ता. अंबाजोगाई जि. बीड, अर्जदार क्र. ५. रत्नमाला भ्र. भगवान चव्हाण, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम रा. जातेगाव ता. गवराई जि.बीड , अर्जदार क्र. ६. गोकर्णा भ्र. गोरखनाथ चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. गोरखनाथ नांदवी ता. पाटोदा जि. बीड यांनी अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आणि अर्जदार क्र. ४,५ व ६ हया मयताच्या मुली या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत जगन्नाथ नानाभाउ सोळंके यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत जगन्नाथ नानाभाउ सोळंके यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १४/११/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : १७/१२/२०२४

स्वाक्षरित **सी. के. पवार** क. लिपिक | (शिक्का) | स्वाक्षरित **सहा. अधिक्षक** दिवार्णी न्यायालय क. स्तर, धारुर

### जाहिर नोटीस

**श्री.एन.एम. वाली, दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर, धारुर यांचे कोर्टात**

**दिवाणी चौकशी अर्ज क्रं. ३३९/२०२४**

**नि. ६/ड**

१. कांताबाई भ्र. दत्तु उर्फ दत्तात्रय तरकसे वय ६८ वर्षे, धंदा घरकाम रा. आसरडोह ता. धारुर जि. बीड. ह.मु. आंबेडकर नगर एम.आय.डी.सी. समोर नवी मुंबई ता. जि. ठाणे, २. सिध्दार्थ पि. दत्तु उर्फ दत्तात्रय तरकसे वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. आसरडोह ता. धारुर जि. बीड. ह.मु. आंबेडकर नगर एम.आय.डी.सी. समोर नवी मुंबई ता.जि. ठाणे, ३. विनोद पि. दत्तु उर्फ दत्तात्रय तरकसे वय ३३ वर्षे, धंदा घरकाम रा. आसरडोह ता. धारुर जि. बीड. ह.मु. आंबेडकर नगर एम.आय.डी.सी. समोर नवी मुंबई ता. जि. ठाणे,४. जया भ्र. संदिप गायकवाड वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा. घाटपळशी ता.जि.जालना.,५. रत्नमाला भ्र. राजेश भालेराव वय ३७ वर्षे, धंदा घरकाम रा. माळेगाव ता. केज जि.बीड

अर्जदार विरुध्द कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिरनामा / नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

मयत दत्तु उर्फ दत्तात्रय पिता दासु तरकसे यांचे दिनांक २३.०९.२००९ रोजी मौजे आसरडोह ता. धारुर जि. बीड, येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. मयत दत्तु उर्फ दत्तात्रय पिता दासु तरकसे यांचे पश्चात शासकिय/निमशासकिय व इतर कार्यालयीन कामाकरीता अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदार हे मयत दत्तु उर्फ दत्तात्रय पिता दासु तरकसे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे याबाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख २५/११/२०२४ रोजी, आमचे, सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.पुढील तारीखः - २३/०१/२०२५

स्वाक्षरित **क. लिपीक** **दिवाणी न्यायालय, क. स्तर धारुर** | (शिक्का) | हुकुमावरुन स्वाक्षरित **सहायक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क. स्तर धारुर


## निवडणूका संपल्या आता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा-राऊत



शिरूर। प्रतिनिधी

लोकशाहीचा उत्सव म्हणत विधानसभा निवडणूका पार पडल्या आसल्या तरी या प्रचारातून बळीराजा कोसो दुर राहीला.जाती-धर्माच्या आधारावरील निवडणूकीतून बहुसंख्य पण दुर्लक्षीत समाजाच्या अनेक समस्या कायमची आहेत.खरीप हंगामातील अतिवृष्टीने बहुतेक मतदार संघातील शेतक-यांच्या पीकांची नुकसान भरपाई ,जाहीर केलेले अनुदाने तसेच पीक विमा कंपनीने विमाधारक क्षेत्राची केवळ सर्वेक्षणे करून तशीच पडून आहेत.त्यांच्याकडील कार्यवाही करणे यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घातले आवश्यक आहे.सद्यस्थितीत शेतमालाची कवडीमोल भावाने शेतक-यांना विक्री करावी लागत आहे.कपाशी उत्पादक क्षेत्रातील कृषि उत्पन्न बाजार समिती तर मूग गीळून गप्प आहेत.खाजगी शेतमाल खरेदी केद्रांवर कोणतेच नियंत्रण नसल्याने शेतक-यांची विविध मार्गाने होणारी लूट थांबवणे आवश्यक आहे.

शेतक-यांचे महाराष्ट ग्रामीण बँका व इतर बँका कडील पीककर्जे या संबधातील अनेक समस्या आहेत.तूर पीकांवरील अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे या बाबतीत कृषीविभाकडुन मार्गदर्शन व किटकनाशके उपलब्ध होणे आवश्यक आहे.रब्बी हंगामातील पीकांना पाणी देण्यासाठी विद्युतविभाकडून अपूरा वीजपूरवठा लोडशेडींग मुळे शेतकरी त्रस्त आहेत.अनेक भागातील शेतक-यांसाठी नवीन ट्रान्सफॉर्मर ची मागणी व आवश्यकता असुन देखील लोकप्रतिनिधी या मागणीची दखल घेत नाहीत.

शेतमालाची नासाडी रोखण्यासाठी शेतक-यांना सौरकुंपन अथवा काटेरी कुंपणाची नाविण्यपूर्ण योजना अद्यापही कार्यान्वीत झाली नाही.त्यामुळे बीड जिल्यातील भूईमुग,मका,या सारखी उत्पादने डुकराच्या त्रासामुळे नामशेष होत आहेत.शेतक-यांच्या शेतररस्ते नसणे त्यांच्यावरील अतिक्रमणे,अनेक शेततरहते रेकॉर्डवर नसल्याने शेतमाल वाहतुक करण्यातील समस्या आहेत तसेच नदी नाल्यावरील पूल उभारणे आवश्यक आहेत.रासायनिक खतांच्या वापराने विविध आजार व शेती नापीक होण्याचा धोका वाढल्याने सेंद्रीय शेती धोरण राबविण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.त्यासाठी पशुधन जतन करून त्यांच्या शेणखत व इतर सेंद्रिय खते,गांडूळ खत, नाडेप कंपोस्ट खते निर्मीतीसाठी प्रशिक्षण करणे, त्यासाठीच्या योजना प्रभावी राबवणे, गोवर्धन गोवंशाची जतन करण्यातील अडचणी, अशा शेतकरी समाजाच्या प्रमुख समस्या आहेत.वेळोवेळी शेतकरी मागणी,निवेदने,आंदोलने करत आसले तरी लोकप्रतिनिधी सोईस्कर डोळेझाक झाल्याने या समस्या अद्यापही आहेत.अशा विविध शेतकरी समस्यांवर शिवश्री कृषि मंडळ यांच्या बैठकित चर्चा करून पुढील काळात या समस्या सोडवण्यासाठीच प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष शिवराम राऊत व सर्व पदाधिकारी सदस्य शेतकरी यांनी निश्चित केले आहे.

# ३२ कृषी प्रक्रिया केंद्रांना मिळणार सार्वजनिक शौचालय

## स्वच्छ भारत मिशनमधून प्रत्येकाला मिळणार दोन लाख दहा हजार

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्यासाठी कृषी प्रक्रिया केंद्रामध्ये सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी निधी देण्याचा निर्णय घेतला असून ६१० सार्वजनिक शौचालय देण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या कडे सार्वजनिक शौचालयासाठी पुरेशी जागा उपलब्ध असताना, पाणी आणि विजेची सुविधा असताना आणि त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची कंपन्यांची तयारी असल्यानंतर हा निधी दिला जाणार आहे. याच वेळी बांधकाम आणि देखभाल दुरुस्तीची जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपन्यांची राहणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रामध्ये अतिरिक्त अभियान संचालक शेखर रौदळ यांनी म्हटले आहे.

स्वच्छ भारत मिशनचे अतिरिक्त अभियान संचालक शेखर रौंदळ यांनी





पत्रात म्हटले आहे की बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प समन्वय व स नियंत्रण कक्ष यांनी ६१० प्रकल्प कार्यालयाच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामास मान्यता मिळण्यासाठी आणि त्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी केली आहे. या ६१० सार्वजनिक रौंदळ यांनी म्हटले आहे. शेतकरी उत्पादक कंपन्याकडे सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध असून सदर जागेवर पाणी व विजेची सुविधा उपलब्ध आहे. तसेच सार्वजनिक शौचालयाचे देखभाल दुरुस्ती करण्यास कंपनी तयार असल्याचे म्हटले आहे. शौचालयाची जागा पाण्याची आणि देखभाल दुरुस्तीची जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपन्यांची राहणार आहे. यासाठी सार्वजनिक शौचालयाचा प्रस्ताव विहित कागदपत्रांची पूर्तता करून सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णयामध्ये अनिवार्य सुविधा आणि मुद्दे अंतर्गत नमूद करण्यात आलेल्या सुविधा प्रस्तावित सार्वजनिक शौचालय मध्ये करणे अनिवार्य आहे. सार्वजनिक शौचालय बांधकामाची जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपन्यांची राहणार आहे शासनाच्या वतीने या सार्वजनिक शौचालयाला तीन लाख रुपयांची निधीची मान्यता देण्यात आली असून यातील ७० टक्के रक्कम स्वच्छ भारत मिशन ग्रामीण यांच्याकडून मिळणार आहे. तर ३० टक्के रक्कम पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत देण्यात येणार आहे. ही रक्कम आराखड्यामध्ये समाविष्ट झाली नाही तर ही ३० टक्के रक्कम वित्त आयोगातून देणे शक्य नसल्यास संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीने द्यावयाची आहे. यासाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहणार आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधी हे बांधकाम पूर्ण करणे अनिवार्य राहील .काम पूर्ण झाल्यानंतर याची नोंद करण्याची जबाबदारी ◀◀ पान ३ वर

### कृषी चंद्रमा ऍग्रो ममदापूरचे काम पूर्ण

अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर पाटोदा येथील कृषी प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या कंपनीचे शेड, गोदाम बांधकाम जवळपास पूर्ण झाले असून शौचालयाची मान्यता मिळाल्यानंतर या शौचालयाचे काम तात्काळ सुरू करण्यात येईल अशी माहिती या कंपनीचे सुनील मामडगे यांनी दिली.

### प्रकल्पाला मुदत वाढ

शेतकरी उत्पादक कंपन्यांना स्वच्छ भारत मिशन मधून सार्वजनिक शौचालय देण्याच्या प्रक्रियेला प्रकल्प संचालक रौंदळ यांनी मुदतवाढ दिली असून ही मुदत आता१५/११/२०२४ऐवजी जानेवारी २०२५ अखेरपर्यंत राहणार आहे .

### आयोगाचे नाही तर स्वत:भरा

या प्रकल्पासाठी लागणारी उर्वरित ३० टक्के रक्कम ही १५ वित्त आयोगातून मिळाली नाही तर ही रक्कम कृषी उत्पादक कंपन्यांनी स्वतः भरावी असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे. यावरून पंधराव्या वित्त आयोगातुन या कामाला निधी मिळण्याची शक्यता दुरापास्त दिसत आहे.

# शहर महानगरपालिकाकडून घर घर संविधान

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व नगर विकास विभाग यांच्या परिपत्रकान्वये. भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या यामुळे अमृत महोत्सव म्हणून साल सन २०२४ –२५ वर्ष ''घर घर संविधान ''म्हणून साजरा होणार आहे.

सदर कार्यक्रम जालना शहर महापालिकेच्या वतीने जालना शहरातील सर्व कुटुंबांना संविधान उद्देशिका भेट देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जालना शहरातील सर्व शासकीय कार्यालय सर्व सामाजिक संघटनेची कार्यालय सर्व राजकीय पक्षाची कार्यालय यांनाही संविधान उद्देशिका भेट म्हणून महापालिकेच्या वतीने देण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने ६० हजार संविधान उद्देशिका छापल्या आहेत. सदर कार्यक्रमाची सुरुवात आज जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पंचाळ यांना



संविधान उद्देशिका ची फोटो फ्रेम भेट देऊन करण्यात आली. त्याचप्रमाणे इतर शासकीय कार्यालयात देखील आज संविधान उद्देशिका भेट देण्यात आल्या महानगरपालिकेच्या १४० अशा सेविका मार्फत देखील प्रत्येक कुटुंबाला उद्या आणि परवा संविधान उद्देशिका भेट म्हणून देण्यात येणार आहेत. सर्व नागरिकांनी आपापल्या घरात संविधान उद्देशिका लावून त्याची नियमित वाचन करावे. करिता महापालिकेच्या वतीने कळविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी श्री पंचाळ यांना संविधान उद्देशिका भेट दे त्यावेळी मा.आयुक्त संतोष खांडेकर, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, डीपी ओ श्री दीपक इंगोले, केशव कानपुडे इतर अधिकारी कर्मचारी हजर होते.

# महायुतीच्या अभूतपूर्व विजयाचा अनिलदादा जगताप यांच्याकडून जल्लोष साजरा!

### एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी शिवसैनिकांकडून साकडे





बीड । प्रतिनिधी

नुकत्याचा पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयी यशाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गर्शनाखाली बीडमध्ये शिवसैनिकांनी महायुतीचे अभिनंदन करत मोठ्या हर्षल्हासात आनंद सोहळा साजरा केला तसेच हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर मा. आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्रभरात सर्व सामन्यांसाठी कल्याणकारी योजना राबवत यशाची पताका फडकावणारे शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी बीड शहरातील सोमेश्वर महादेव मंदिरात भावीक भक्तांच्या उपस्थितीत सामूहिक आरती करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी साकडे देखील घातले.

काल सोमवारी दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन महापुरुषांना अभिवादन ◀◀ पान ३ वर

### वेदवती रामदयाल टवाणी यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



शहरातील मंगलनाथ कॉलनी भागातील रहिवाशी असलेल्या वेदवती रामदयाल टवाणी वय ८४ वर्षे यांचे वृध्दापकाळाने दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थीवावर राजस्थानी वैकुंठधाम येथे दि. २६ मंगळवारी सकाळी १० वाजता अंत्यविधी करण्यात येणार आहे. मनकॉट जिनिंगचे संचालक रामेश्वर टवाणी यांच्या आई होत.

### आमच्या दैवता बद्दल बोलणाऱ्याला त्याच भाषेत उत्तर दिले जाईल

**संदिप खाकाळ याचा इशारा**

आष्टी । प्रतिनिधी

राजकारण करताना राजकारणाच्या पध्दतीने करायला करायला हवे.उगाच खोटा आव आणून चुकीचे वक्तव्य करून आदरणीय सुरेश आण्णा धस व त्याच्या कुटुंबाबद्दल बेताल वक्तव्य करून नका.धस कुटुंब आमच्यासाठी दैवत आहे.जर कोणी आमच्या दैवता बद्दल अपशब्द बोलत असेल तर त्याला त्याच भाषेत उत्तर दिले जाईल असा इशारा धस समर्थक संदिप खाकाळ यानी दिला आहे.

आमच्या वर छत्रपती शिवाजी महाराज, साधू,संताचे,आमचे आई,वडिलांचे संस्कार आहेत. उगाच खोटा आव आणून सुरेश आण्णा धस व त्याच्या कुटुंबाबद्दल खालच्या स्तरावर जाऊन कोणीही भाष्य करू नये.काय चर्चा करायची ती समोर येऊन करा.ज्या भाषेत बोलाल आता त्याच भाषेत उत्तर दिल जाईल.असा खणखणीत इशारा संदिप खाकाळ यांनी दिला आहे..

# वाचाळविरांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी

## आ.धस समर्थक आक्रमक ; आष्टीसह मतदारसंघ बंद करण्याचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांनी अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांचा प्रचार केल्यामुळे दुखावलेल्या आमदार सुरेश धस यांनी आमदार पंकजा मुंडे यांनी असे करावयास नको होते असे वक्तव्य विजयी सभेमध्ये केल्यानंतर आमदार पंकजा मुंडे समर्थकांनी आमदार सुरेश धस यांचे कुटुंबीयांवर अत्यंत खालच्या पातळीमध्ये टीका टिपणी केल्याचा व्हिडिओ



व्हायरल झाल्यामुळे आमदार सुरेश धस यांचे समर्थक आक्रमक झाले आणि त्यांनी या वाचाळवीरांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना अटक करावी अन्यथा संपूर्ण मतदारसंघातील गावांमध्ये बंद करून निषेध व्यक्त करण्यात येईल असा इशारा आमदार सुरेश धस यांचे समर्थकांनी दिला आहे.

आष्टी पोलीस स्टेशन मध्ये दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की,आ.सुरेश धस यांचा विक्रमी मताने विजय झाल्यानंतर भा.ज.पा.च्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी विरोधी उमेदवाराला मदत करून पराभव करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला सोशल मीडियावर पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी आमदार सुरेश धस यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका टिपणी करत असल्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आष्टी पोलीस स्टेशन येथे समर्थकांनी घोषणाबाजी करत जाहीर निषेध व्यक्त करत आमच्या दैवताबाबत वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करून २४ तासाच्या आत अटक करावे अन्यथा तीव्र आंदोलन करत आष्टी शहरासह मतदार संघातील गावागावात बंद पाळण्याचा इशारा समर्थकांनी दिला असून आष्टी पोलीस स्टेशनचे निरीक्षक शरद भुतेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. दलित,आदीवासी,भटके विमुक्त,वंचीत,बहुजन समाजाचे नेते आ.सुरेश धस यांच्या कुटुंबीयावर राजकीय द्वेषापोटी अश्लिल भाषेत बोलुन तो व्हीडीओ व्हायरल करून ◀◀ पान ३ वर

# भाटवडगाव वसाहतीत घर फोडी

### चोरट्यांनी केला ७० हजारांचा ऐवज लंपास



**माजलगाव । प्रतिनिधी**

नातेवाईकाच्या लग्न असल्याने घरातील सर्वजण औरंगाबाद येथे गेले होते.घरी कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत घुसून कपाटाच्या लॉकर तोडून आतील रोख ६० हजार आणि २ ग्राम सोन्याचे दागिने किंमत १० हजार असा एकूण ७० हजारांचा ऐवज लंपास केला.हा प्रकार लग्नाहून परत आल्यानंतर उघडकीस आला. याप्रकरणी इम्रान रहिम बागवान रा. भाटवडगाव वसहात माजलगाव यांनी पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार भंडाणे हे करीत आहेत.

# शिरूर तालुक्यात आ.पंकजा मुंडे समर्थकांच्या अनेक गावात कमळापेक्षा शिट्टीला जादा मतदान

**शिरूर । प्रतिनिधी**

आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदार संघामध्ये भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव असलेल्या आ.पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी भाजपचे उमेदवार सुरेश धस यांच्याविरुद्ध केवळ प्रचारच केला नाही तर ओबीसी फॅक्टरच्या नावाखाली शिरूर तालुक्यातील काही गावांमध्ये अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना अधिकचे मताधिक्य मिळवून दिल्याचे मतदान केंद्र निहाय झालेल्या मतदानातून स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यामध्ये आ. पंकजा मुंडे यांच्या समर्थकाचा मोठा प्रभाव आहे त्याच गावांमध्ये भा.ज.पा. उमेदवार सुरेश धस यांच्याशी म्हणजे पर्यायाने भा.ज.प.पक्षाशी देखील बेईमानी करण्यात आली आहे आणि अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांची शिट्टी वाजवली आहे.

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील चुरशीच्या निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार सुरेश धस हे मोठी आघाडी घेतील अशी चर्चा सर्वत्र रंगत होती.

तसे पाहता सुरेश धस यांना तीन ही तालुक्यामध्ये चांगली मते मिळतील आणि

### पंकजा मुंडे च्या जाहीर सभेस कार्यकर्त्यांची अनुपस्थिती

शिरूर तालुक्यात कोणत्याही ठिकाणी भाजपच्या नेत्यांची अथवा मुंडे कुटुंबीयातील कोणाच्याही सभेचा कार्यक्रम असल्यास तालुक्यातील सर्व समर्थक यावेळी कार्यक्रमास हजर असतात परंतु शिरूर शहरात झालेल्या जाहीर सभेत पंकजा मुंडे यांना मानणारा कार्यकर्ता वर्ग अनुपस्थित होता, त्यांना नेमका कोणाचा आदेश होता ? असा प्रश्न या निमित्ताने समोर येत आहे.







भा.ज.प.चे उमेदवार सुरेश धस निवडून येतील असे एकीकडे ठामपणे सांगितले जायचे. तर दुसरीकडे भाजप पक्षातूनच लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा बदला घ्यायचा यासाठी काही फितूर लोकांकडून सुरेश धस यांना पाडण्यासाठी ओबीसी फॅक्टर च्या नावाखाली मोठे षडयंत्र रचले जात होते.यामध्ये आ.पंकजा मुंडे यांचे समर्थक म्हणणारे जि.प.सदस्य रामदास बडे, रामराव खेडकर, प्रकाश बडे, देविदास गर्कळ,ज्ञानदेव केदार आदी भाजप कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. वरील या कार्यकर्त्यांनी खुलेआम पणे आम्ही ताईचे समर्थक आहोत आम्हाला भाजपचे काही घेणे नाही. आपला उमेदवार म्हणजे भीमराव धोंडे हे आहे असा प्रचारही केला. या सर्व षडयंत्राची भनक उमेदवार सुरेश धस यांना लागली होती. सुरेश धस यांचा निवडणुकीत दणदणीत विजय झाल्या नंतर विजयी सभेमध्ये त्यांनी या सर्व गोष्टीची खदखद आपल्या भाषणातून व्यक्त केली होती. याच विरोधी टोळीने धस यांच्या भाषणाचा विपर्यास करून समाजाची दिशाभूल केली. निवडणुकीचा ◀◀ पान ३ वर

# लोकशाही दिनाचे २ डिसेंबर रोजी आयोजन

जालना । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्ह्यात दि. २ डिसेंबर, २०२४ सोमवार रोजी सकाळी ठिक १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देतांना त्यांनी संबंधित तालूक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी कळविले आहे. कोणत्याही स्तरावर लोकशाही दिनात खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणर नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तसलीदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# ....म्हणून मी हरलो, पराभवानंतर सुनील टिंगरे यांचा खळबळजनक दावा

पुणे : वडगाव शेरी मतदार संघात शरद पवार गटाच्या बापू पठारे यांनी अजित पवार गटाच्या सुनील टिंगरे यांचा पराभव केला. मात्र या पराभवानंतर सुनील टिंगरे यांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केलीय. पोर्षे कार प्रकरणावरून माझ्यावर सातत्याने टीका केली. माझी बदनामी करून विरोधकांनी फेक नरेटिव्ह सेट केला आणि त्याचा फटका मला बसलाय. त्या सोबतच मी शरद पवारांनी नोटीस न पाठवता तस सांगण्यात आलं. विकास काम नाही तर पैसा जिंकला, अशीही प्रतिक्रिया त्यांनी यावेळी बोलताना दिलीये.



वडगाव शेरीतील निवडणूक सुरुवातीपासून चर्चेची ठरली होती. या मतदारसंघामध्ये भाजपसह राष्ट्रवादी उमेदवारी मिळवण्यासाठी आग्रही होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांना हा मतदारसंघ मिळवला मात्र, त्यानंतर भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी जगदीश मुळीक यांनी प्रयत्न केले. त्यांना पक्षाकडून एबी फॉर्म देखील मिळाला, मात्र त्यांनी तो भरला नाही. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी मुळीक यांची समजूत काढली. त्यानंतर त्यांनी महायुतीचा धर्म पाळणार असल्याचं म्हटलं होतं. असे असले तरी या मतदारसंघात शरद पवार गटाच्या बापू पठारे यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली आहे.

निवडणुकीच्या प्रचारावेळी कल्याणीनगर भागातील पोर्शे कार अपघात प्रकरणातील आरोप, शरद पवारांना पाठवलेली नोटीस, ही प्रकरणे विरोधी पक्षांनी लावून धरली होती. त्यानंतर त्यांच्या मतदारसंघातील भाजपचे इच्छुक उमेदवार जगदीश मुळीक यांनी देखील टिंगरेंनी कल्याणीनगर अपघात प्रकरणावरून टीका केली होती, त्या प्रकरणांचा निवडणुकीत फरक पडल्याचे दिसून आले आहे.

बापू पठारे यांच्या विजयात सुरेंद्र पठारे किंगमेकर

विधानसभेच्या या लढाईत बापूसाहेब पठारे यांना मुलाची साथ लाभली ती म्हणजे मुलगा सुरेंद्र पठारे यांची. सुरेंद्र पठारे हे देखील मागील काही वर्षापासून वडगाव शेरीचा राजकारणात सक्रिय आहेत. या संपूर्ण परिसरात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. मतदारसंघातील प्रत्येक छोट्या मोठ्या कामात त्यांनी सहभाग घेत अडचणी सोडण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी आंदोलने ही केली आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले.

गेल्या काही वर्षांपासून सुरेंद्र पठारे यांनी मतदार संघात आपला जनसंपर्क वाढवत कामाला सुरूवात केली. प्रत्येक गोष्टीत सहभागी होत त्यांनी मतदार संघतल्या अडचणी जाणून घेतल्या व सोबतच पर्यायाने त्या सोडविण्यासाठी लढा उभारला आणि आंदोलने केली. पुण्यातील सीईओपी महाविद्यालयातील गोल्ड मेडलिस्ट असलेल्या सुरेंद्र पठारे यांनी मागील काही वर्षात संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. दीड महिन्यांपासून ते पायाला भिंगरी लागल्यासारखी फिरत होते. आणि त्याचा परिणाम विजयात झाला. वडील बापूसाहेब पठारे यांच्या गळ्यात त्यांनी विजयाची माळ घातली.

वडगाव शेरीचा मताधिक्य काय?
विजयी उमेदवार: बापूसाहेब पठारे
मतं: १,३३,६८९
पराभूत उमेदवार: सुनील टिंगरे
मतं: १,२८,९७९
मताधिक्य: ४७१०

# खून करुन स्मशानात सरणावर जाळले : मात्र पोलिसांनी उघड केला गुन्हा

पुणे, - अंत्यसंस्कार झालेल्या मृतदेहाशेजारील रक्ताळलेल्या लाकडावरून ग्रामीण पोलिसांनी खुनाचा गुन्हा उघडकीस आणला. ही घटना इंदापूर येथील तावशी गावामध्ये घडली. या प्रकरणी धागेदोरे हाती नसताना पोलिसांनी आरोपींना जेरबंद केले. तसेच खून झालेल्या व्यक्तीची ओळखही पटवली. हरिभाऊ धुराजी जगताप (७४ रा. गंगाखेड, परभणी ) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी दादासाहेब मारुती हरिहर ( ३० रा. गोखळी, ता. फलटण) व त्याचा मित्र विशाल खिलारे (२३ , रा. गोखळी, ता. फलटण ) यांना अटक करण्यात आली.




पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, तावशी येथील स्मशानभूमीत एक मृतदेह जळत आहे. त्या शेजारी असलेल्या लाकडावर रक्ताचे डाग लागल्याची माहिती तेथील पोलीस पाटील यांनी वालचंदनगर पोलिसांना दिली. पथकाने तेथे धाव घेतली, त्यावेळी स्मशानभूमीत सांडलेले रक्तही दिसले. तर, मृतदेहाचे पूर्ण दहन झालेले होते. मात्र, रक्ताचे डाग ताजे असल्याने हा खुनाचा प्रकार असू शकतो अशा निष्कर्षाप्रत पोलीस आले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही तपासात सहभागी झाले. दोन्ही पथकांनी इंदापूर, माळशिरस व फलटण तालुक्यांमध्ये तपास केला.

दरम्यान, ही लाकडे आणली त्या गुणवरे ता. फलटण येथील वखारीत पोलिसांनी तपास केला. तेव्हा दादासाहेब आणि विशाल यांनी अंत्यविधीसाठी ही लाकडे नेल्याचे समोर आले. दोघांची चौकशी केली असता, त्यांनी खुनाची कबुली दिली. मृत जगताप यांचा पत्नीवर वाईट नजर असल्याचा दादासाहेबला संशय होता. यामुळे त्याने मित्र विशालच्या मदतीने जगताप यांना १५ नोव्हेंबर रोजी माण तालुक्यातील सतोबाची यात्रा येथून जेवण करण्यासाठी सोबत घेतले. यानंतर तावशी गावाजवळ गाडी थांबवली. तेथे डोक्यात दांडके मारून खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह स्मशानभूमीत जाळून टाकला.

या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे, कुलदीप संकपाळ, सहायक पोलीस फौजदार बाळासाहेब कारंडे, पोलीस अंमलदार शैलेश स्वामी, गुलाबराव पाटील, गणेश काटकर, अजित थोरात, स्वप्नील अहिवळे, अजय घुले, नीलेश शिंदे, विक्रमसिंह जाधव, अभिजीत कळसकर यांनी केला.

# घराघरांत धर्म आणि विज्ञाचा समन्वय हवा

पुणे, - धर्म आणि विज्ञान यांचा समन्वय घराघरांत झाला तर प्रत्येकाला शांतीचा अनुभव घेता येऊ शकतो. हेच सूत्र समाजासाठी लागू झाल्याने विश्वशांती निर्माण होण्यास वेळ लागणार नाही, तसेच प्रत्येकाने चेहर्यावर हास्य ठेवणे या क्रांतिकारी प्रयोगामुळे ही जीवनात शांतीचा अनुभव येतो. प्रत्येकाने संकल्प करावा की घरामध्ये प्रवेश करताना चेहर्यावर हास्य ठेवावे, असे विचार उज्जैन येथील आध्यात्मिक गुरू पं. विजयशंकर मेहता यांनी व्यक्त केले.





एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे युनेस्को अध्यासनअंतर्गत २९ वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी पैठणकर, शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, युनेस्को अध्यासनाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ कराड, संस्थेचे कार्याध्यक्ष राहुल कराड, डॉ. मंगेश कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस व व्याख्यानमालेचे समन्वयक व प्रकुलगुरू मिलिंद पांडे उपस्थित होते.पंडित मेहता म्हणाले, की सामाजिक जीवनात वचन बद्धतेचे पालन करणे, कुटुंबाला प्राथमिकता देणे आणि स्वतःला शांत ठेवावे. यामुळे कुटुंबात, समाजात आणि संपूर्ण विश्वात शांती नांदेल. पैठणकर म्हणाले, आजच्या युगामध्ये अध्यात्म आणि विज्ञानाची वेगळी परिभाषा करणे योग्य नाही.

डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, मन आणि आत्मा या गोष्टींचे अधिक चिंतन व्हावे. जीवनाचा हेतू व कर्तव्य काय आहे, याची जाणीव या व्याख्यानमालेतून होते.

# पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**बेल्हे | प्रतिनिधी**


निमगाव सावा (ता.जुन्नर) येथील श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या १२५ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.



संस्थेचे सचिव परेश घोडे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की १ नोव्हेंबर १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी कार्यभार सांभाळला. १ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून निवड झाली.यशवंतराव चव्हाणांचं कार्य हे राज्य आणि देशाप्रती मोठं होतं. राजकीय पटलावरील एक मोठं नाव त्यांचं त्यावेळी होतं आणि ते आजही आहे. १९६२ ते ६६ या काळात भारताचे संरक्षण मंत्री १९६६ ते ७० भारताचे गृहमंत्री, १९७० ते ७४ भारताचे अर्थमंत्री आणि १९७४ नंतर भारताचे परराष्ट्र मंत्री अशा वेगवेगळ्या पदांवरती त्यांनी आपले कर्तुत्व सिद्ध केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संदिपान पवार, सचिव परेश घोडे, संस्था प्रतिनिधी कविता पवार, प्राचार्य प्रल्हाद शिंदे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राचे केंद्र संयोजक प्रा.अनिल पडवळ, कला शाखाप्रमुख सुभाष घोडे, विज्ञान शाखाप्रमुख प्रवीण गोरडे, प्रा. माधुरी भोर, प्रा. पूनम कुंभार, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. ज्योती गायकवाड,प्रा. अश्विनी जोरे, प्रा. पुनम पाटे, प्रा. धनंजय भांगरे यांच्यासह सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र संयोजक प्रा अनिल पडवळ यांनी प्रास्ताविक केले व प्रा. सुभाष घोडे यांनी आभार मानले.

# पुढील आठवडाभर धुक्याची झालर



पुणे, - गेल्या दोन दिवसांत पुण्यात थंडी जाणवू लागली असून, पुढील आठवडाभर सकाळी धुक्याची झालर पसरण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

गेल्या दोन दिवसांत हवेत गारठा निर्माण झाला असून, थंडीची चाहूल आता लागली आहे.वातावरण बदलामुळे दिवाळीनंतर थंडी पडण्याला सुरूवात झाली आहे.

गेले काही दिवस पहाटे गारवा जाणवत होता. मात्र गेल्या दोन दिवसांत दिवसभर हवेत गारवा जाणवत आहे. पुढील आठवडाभर आकाश निरभ्र राहून गुलाबी थंडीचा अनुभव घेता येणार आहे.

# महाविकास आघाडीचे कार्यकर्ते अजूनही धक्क्यात

पुणे, - विधानसभा निवडणुकीत पराभव पदरी पडलेल्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना धक्का बसला आहे. महाविकास आघाडीला शहरात सकारात्मक वातावरण असतानाही उमेदवारांना पराभव सहन करावा लागला. हे निकाल मनाला न पटणारे असून, निकालात फेराफार झाले आहेत का?' अशी शंका कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. पराभूत उमेदवारांचे हे कार्यकर्ते गेल्या दोन दिवसांपासून वारंवार एकमेकांची भेट घेत असा निकाल लागलाच कसा' यावर मंथन करत आहेत.




अगदी सहा महिने आधी लोकसभा निवडणुका झाल्या. यात पुण्यात भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हे सव्वा लाख मतांनी विजयी झाले असले, तरी पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात काँग्रेसला मताधिक्य होते. तर, शिवाजीनगर मतदारसंघात तीन हजारांच्या आसपास मताधिक्य होते. खडकवासला आणि हडपसर मतदारसंघात मतदारांनी आपला कौल सरळसरळ महाविकास आघाडीच्या उमेदवारांना दिला. त्यामुळे खडकवासला, शिवाजीनगर, पुणे कॅन्टोंन्मेंट या मतदारसंघांत विधानसभेला उमेदवार बदलाची चर्चा होती. त्यामुळे पोटनिवडणुकीप्रमाणे कसबा तसेच वरील तिन्ही मतदारसंघांत आपले उमेदवार विजयी होतील, असे सर्व्हे आपल्या बाजूने असल्याचे महाविकास आघाडीचे नेते निवडणुकीच्या आधीपासूनच सांगत होते.

मतदानानंतरही या भागांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे विजयाचे फलक लावण्यात आले. प्रत्यक्षात केवळ वडगाव शेरी वगळता इतरत्र भाजप- महायुतीच्या उमेदवारांनी विक्रमी मताधिक्याने निवडून येत सर्व अंदाज खोटे ठरविले आहेत. त्यामुळे आपल्या उमेदवाराचा पराभव कसा झाला? याचे गणितच उलगडत नसल्याचे महाविकास आघाडीचे कार्यकर्ते सांगत आहेत.

मतदारांनी महायुतीच्या उमेदवारांना का निवडून दिले, हेच समजायला मार्ग नाही. नेमकी कोणती विकासकामे, शासनाच्या नेमक्या कोणत्या योजना राबविल्या? का जनसंपर्क वाढविला? कोणत्या आधारावर मतदान झाले, हे समोर येणे गरजेचे आहे.

- महेश पोकळे, महविकास आघाडी कार्यकर्ता

कसबा मतदारसंघात आम्ही दिवसरात्र काम केले. मतदारांचा प्रतिसादही प्रचंड होता. त्यामुळे आमचाच उमेदवार विजयी होणार, याची खात्री होती. मात्र, निकाल आम्हालाही धक्कादाक आहे. आता खचून न जाता आम्ही पुन्हा नव्या जोमाने लढण्यास सज्ज आहोत.

- परेश खांडके, महाविकास आघाडी कार्यकर्ता

# मावळ पॅटर्न उद्ध्वस्त करणारे सुनील शेळके कसे जिंकले, मोदींसोबतच्या भेटीचा किस्सा दादांनी सांगितला, तटकरेंनी गालगुच्चा घेतला

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील सर्वाधिक लक्षवेधी लढत ठरलेल्या मावळ मतदारसंघात अजित पवार गटाच्या सुनील शेळके यांनी बाजी मारली. या मतदारसंघातून सुनील शेळके यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपने प्रचंड विरोध केला होता. मावळमध्ये यंदा सुनील शेळके (डींपळश्र डहशश्रज्ञश) यांना पाडण्यासाठी सर्वपक्षीय एकत्र आले होते. राज्यात या मावळ पॅटर्नची (चर्रींरश्र झर्रीींशीप) चांगलीच चर्चा रंगली होती. मात्र, सुनील शेळके या सर्व विरोधकांचे आव्हान मोडीत काढत विजयी होऊ दाखवले. सुनील शेळके मावळमधून थोड्याथोडक्या नव्हे तर एक लाखांपेक्षा जास्त मताधिक्य घेऊन निवडून आले आहेत. यानंतर सुनील शेळके यांनी अजित पवार (-क्षळीं झरुरी) यांची भेट घेतली. त्यावेळी अजित पवार यांनी सुनील शेळके आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोचा एक किस्सा उपस्थितांना सांगितला.




अजित पवार यांनी सांगितले की, याची तर ओळख मी डायरेक्ट... आमच्यावेळी मोदींच्या सभेवेळी हा बाहेर थांबला. आमच्या इथे सगळे आमदार आत, शेवटी याला कोणी आतच घेईना. शेवटी मोदीसाहेब शेजारी बसल्यावर सांगितलं, माझा एक आमदार बाहेर थांबलाय, त्याला ताबडतोब आत घ्यायचा आहे. त्यांनी मागच्या सिक्युरिटीला सांगितलं, अजित पवार कोणाला बोलतात, त्याला आत घ्या. मग आत घेऊन सुनील शेळकेंची सेप्रेट ओळख करुन दिली, तोच फोटो त्याने सगळीकडे चालवला. कारण भाजप टोटली विरोधात. सुनील मला आधी म्हणायचा माझी सीट गेली. पण मतदानाच्या दिवशी म्हणाला माझी सीट एक लाखांनी निवडून येणार. माझ्यापेक्षा जास्त मताधिक्याने सुनील शेळके निवडून आला, असे अजित पवार यांनी म्हटले

जयंत पाटील विजयाचं सर्टिफिकेट घ्यायलाही आले नाहीत, अमोल मिटकरींचा टोला

जयंत पाटील साहेब यांच्याबाबत मला वाईट वाटते. ते विजयाचं प्रमाणपत्र घ्यायलाही गेले नाहीत. जयंत पाटलांनी आनंदोत्सवही साजरा केला नाही, असा टोला अमोल मिटकरी यांनी लगावला. कर्जत-जामखेडमध्ये राम शिंदे यांच्यासारख्या मोठ्या व्यक्तीविरोधात निवडणूक लढताना रोहित पवारांनी त्यांची लायकी काढली. ते कर्जत जामखेडच्या मतदारांनी नाकारलं. बारामती अ‍ॅग्रोचा पैसा आणि काही पेड गुंड राम शिंदेंच्या विजयाआड आले. पण भाजप राम शिंदे यांना योग्य पद्धतीने बळ देईल आणि योग्यवेळी ते आपल्या पराभवाचा वचपा काढतील, असे अमोल मिटकरी यांनी म्हटले.

# राज्यात ४५ साखर कारखान्यांची धुरांडी पेटली

पुणे : राज्यात साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरु झाला असून आतापर्यंत १७५ कारखान्यांनी गाळपासाठी परवाना घेतला आहे. त्यापैती आतापर्यंत ४५ कारखान्यांचे गाळप सुरु झाले आहे. यामध्ये राज्यात नांदेड विभागातील सर्वाधिक ११ कारखान्यांचे तर पुणे विभागातील ८ कारखान्यांचे गाळप सुरु झाल्याची माहिती साखर आयुक्तालयाकडून देण्यात आली.



विधानसभा निवडणुकांमुळे यंदाचा ऊस गाळप हंगाम काहिसा विलंबाने सुरु झाला. यंदाच्या हंगामात सुमारे २०० साखर कारखान्यांनी गाळप परवाना घेणे अपेक्षित आहे. त्यापैकी आतापर्यंत १७५ साखर कारखान्यांनी परवाना घेतला आहे.

त्यात सहकारी ८३ साखर कारखाने तर खासगी ९२ साखर कारखान्यांचा समावेश आहे. त्यापैकी त्यापैकी आतापर्यंत ४५ कारखान्यांनी प्रत्यक्षात गाळप सुरु केले आहे. त्यात १९ सहकारी तर २६ खासगी कारखान्यांचा समावेश आहे. ४५ साखर कारखान्यांनी आतापर्यंत १०लाख ३५ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करून ६ लाख२३ क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. तर साखर उतारा ६.०२ टक्के मिळाला आहे.

cmyk